# श्री साईलीला



दासगणूंना पांडुरंग स्वरुपात बाबांचे दर्शन



वारी )

किंमत ६० पैसे

# अनुक्रमणिका – जानेवारी १९७८


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय – स. न. वि. वि. | — | श्रीसाईबाबा व स्वामी विवेकानंद |
| २) गाठीभेटी–संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी | — | सदानंद चेंदवणकर |
| ३) युगावतार श्रीसाईबाबा | — | श्री. चंद्रकांत सामंत |
| ४) श्रीसाई–प्रसाद | — | डॉ. अनिल जायस्वाल |
| ५) साई ! साई ! साई ! | — | सौ. लीला सदाशिव पाठारे |
| ६) माझी साईभक्ती | — | सौ. लुसी गंगाधर गुप्ते |
| ७) बाबांची लीला | — | श्री. शंकरराव जोगस |
| ८) वाऱ्यावरचे विचार | — | श्री. द. शं. टिपणीस |
| ९) जो जो मज भजे... | — | श्री. बी. व्ही. लांजेकर |
| १०) कृपेने कन्या, कन्येचे कुंकू व शुभमंगल | — | श्री. प्र. अ. पुराणिक |
| ११) जेथे जातो तेथे... | — | कु. उज्वला नाईक |
| १२) भाई लॉरेंसचे विचार व अनुभव | — | श्री. वि. अ. कुलकर्णी |
| १३) सत्पुरुषाविषयीचा आदर | — | श्री. एन्. जी. परुळेकर |
| १४) कुत्र्यास जीवदान | — | सौ. विमल परदेशी |
| १५) शिरडीवृत्त | — | ऑक्टोबर–नोव्हेंबर ७७ |
| १६) श्रीसाईदर्शन | — | श्रीसती गोदावरी माताजी |
| १७ श्रीसाईनाथ प्रसन्न | — | डॉ. सुमती खानविलकर |
| १८) ऐसे दानी मेरे साई | — | श्री. जयवंत कुलकर्णी |
| १९) प्रभो साईनाथाच्या नामस्मरणात, साईलीलेची कृती | — | श्री. अरुण जोहरी |
| २०) हे साई | — | श्री. अशोक केळकर |
| २१) श्रीसाईभाव | — | श्री. शिरसाट गुरुजी |
| २२) पाय ते धरावे साईनाथाचे | — | श्री. प्रभाकर जठ |
| २३) आम्ही देवाची लेकरं | — | श्री. शशिकांत तोंडवळकर |
| २४) साईनाथ सद्गुरु माझे | — | श्री. प्रभाकर जोशी |
| २५) झाल्या ग तिन्हीसांजा... | — | सौ. नीला प्रभु |
| २६) तू साईनाथ माझा | — | श्री. अरविंद शिंदे |

जगा लावावें सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्रीसाईलीला

[श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे
अधिकृत मासिक]

वर्ष ५६ वे] जानेवारी १९७८ [अं. ९

: संपादक :
श्री. का. सी. पाठक,
रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :
● डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
● श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६-०० (ट. ख. सह)
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४-बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३३ ६१

## श्रीसाई वाक्सुधा

दैव शिरडीचें, म्हणूनि झालें ।
बाबा तेथें आगमन आपुलें ।
पुढें तेथेंच वास्तव्य केलें ।
क्षेत्रत्व आणिलें त्या स्थाना ॥२१॥

धन्य शिरडीचें सुकृत ।
कीं हा साई कृपावंत ।
करी या स्थळा भाग्यवंत ।
अलंकृत निजवास्तव्यें ॥२२॥

तूंचि माझा चेतविता ।
तूंचि माझी वाचा चाळिता ।
तैं मी कोण तव गुण गाता ।
कर्ता-करविता तूं एक ॥२३॥

तुझा नित्य समागम ।
हाचि आम्हां आगम-निगम ।
तुझें नित्य चरित्र श्रवण ।
हेंचि पारायण आमुतें ॥२४॥

अनिमेष तुझें नामावर्तन ।
हेंचि आम्हां कथाकीर्तन ।
हेंचि आमुचे नित्यानुसंधान ।
हेंचि समाधान आम्हांतें ॥२५॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय २६ वा

## संपादकीय—

स. न. वि. वि.–

# श्रीसाईबाबा व संत विवेकानंद

ख्रिस्ती मतप्रचारक जे मिशनरी त्यांच्या मायभूमीत ज्यांनी प्रवेश करून हिंदुधर्माची दिव्य पताका तेथे रोवली व सर्व धर्मात हिंदु धर्मच श्रेष्ठ आहे असे छातीठोकपणे स्पष्ट केले, त्या स्वामी विवेकानंदाचे पुण्यस्मरण या महिन्यात करावयाचे आहे. साईबाबा आणि स्वामीजी यांच्या विचारसरणीत व तत्वप्रणालीत भरपूर साम्य आहे.

स्वामी विवेकानंदाचे खरेखुरे मूळचे नाव नरेंद्रदत्त नि पित्याचे नाव विश्वनाथदत्त. शके १७८४ च्या पौष वद्य ७, म्हणजे १२ जानेवारी १८६२ या दिनी कलकत्यातील सिमूलिया या एका गावात, भारतीय तत्वज्ञानाचा सर्व विश्वभर प्रसार करणाऱ्या या थोर पुरुषाचा जन्म झाला. कलकत्याच्या ख्रिश्चन महाविद्यालयातूनच त्यांनी भारतीय व पाश्चात्य तत्वज्ञानांचा अभ्यास करून तेथूनच पुढे ते पदवीधर झाले. प्रथम यांचा ओढा बुद्धिवादाकडे असून ब्राम्होसमाजाकडे कल होता. स्वामीजी स्वामी रामकृष्ण परमहंसांना गुरुस्थानी मानत. रामकृष्ण परमहंसांच्या दर्शनाने त्यांच्या मनाची तळमळ दूर होऊन ते त्यांचे शिष्य बनले.–"ईश्वरसाक्षात्कार म्हणजे धर्म अशी त्यांनी धर्माची व्याख्या केली. प्रथम संन्यास, नंतर सर्व धर्माविषयी ऐक्यबुद्धि, नंतर ईश्वर प्राप्ती असा त्यांचा साधनक्रम होता. रामकृष्णजी समाधिस्थ झाल्यावर पुढे सहा वर्षे त्यांच्याच प्रेरणेने त्यांनी भारतभ्रमण केले नि हिमालय–तिबेटात बराच काळ घालविला. नंतर मद्रासहून जपानमार्गे अमेरिकेला गेले. तेथील जागतिक धर्मपरिषदेत विवेकानंदांनी चांगलाच लौकिक मिळविला. आपल्या व्याख्यानांतून भारतीय तत्वज्ञानाचे उज्ज्वल रूप सांगून त्यांनी सर्व अमेरिका हालवून सोडली व अगणित शिष्य जोडले. तेथील वास्तव्यात स्वामीजींनी जगप्रसिद्ध 'राजयोग' हा ग्रंथ लिहिला. स्वामीजींच्या व्याख्यानावर अमेरिकेत पुष्कळ लोकांनी गडगंज संपत्ति मिळविली! तदनंतर स्वामीजी इंग्लंडला गेले. तेथे मॅक्समुल्लरसारख्या पंडितांशी परिचय होऊन भगिनी निवेदितासारख्या शिष्या त्यांना लाभल्या. १८९७ मध्ये कोलंबोवरून ते कलकत्यास आल्यावर त्यांनी रामकृष्ण मठाची स्थापना करून आपल्या वेदान्ताला जनसेवेची जोड दिली.

विवेकानंदांची पूर्वपरंपरा आध्यात्मिक वैभवाने नटलेली आहे. 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या उक्तीप्रमाणे विवेकानंद या श्रेष्ठ व्यक्तीच्या कुलाच्या इतिहासही उज्जवल असाच आहे. विवेकानंदांचे आजे बाबू दुर्गाचरण दत्त यांनी ऐन वयातच संन्यास घेऊन परमार्थवृत्ती स्वीकारली होती. दुर्गाचरणांचे चिरंजीव विश्वनाथबाबू मोठे विद्वान होते. त्यांची ज्ञानलालसा अतुलनीय, लोकोत्तर अशीच होती. त्यांची पत्नी भुवनेश्वरी ही देखील आदर्श आर्य स्त्री होती. तिचा चेहरा भव्य व उदात्त असून त्यावर दिव्यशक्तीचे तेज ओसंडत असे. रामायण महाभारतातील कित्येक भाग तिने मुखोद्गत केले होते. नरेंद्रांच्या नामकरणाच्या दिवशी अनेकानी 'दुर्गादास' हे नाव सुचविले; परंतु भुवनेश्वरीदेवीच्या पसंतीने 'वीरेश्वर' हे नाव ठेवण्यात आले. पुढे नरेंद्र हेच नाव रूढ झाले. अलौकिक बुद्धिमत्ता, खेळाडूपणा तेजस्विता या गुणांच्या साह्याने नरेंद्रांचे शिक्षण झपाट्याने होऊ लागले. यांचा आवाज मोठा मधुर होता. लहानपणी त्यांचा स्वभाव हट्टी व खोडकर असला तरी साधुसंतांविषयी प्रेम त्यांना होतेच. स्वामींच्या ठायी शंकराचार्यांची बुद्धिमत्ता व चैतन्यांप्रमाणे हृदयाचा प्रेमळपणा होता. बी. ए. ची परीक्षा दुसऱ्या दिवशी असताना त्यांच्या हृदयात अध्यात्मज्ञानाचा दिव्य आनंद निर्माण झाला. ते इच्छामरणी होते असे दिसते. कारण 'चाळीस वर्षानंतर मी जगणार नाही.' असे ते म्हणत असत, व ते वयाच्या ३९ व्या वर्षीच समाधिस्थ झाले. त्या शुक्रवारी म्हणजे ४ जुलै १९०२ रोजी दुपारी १ वाजता त्यांनी आपल्या ब्रह्मचारी शिष्यांच्या खोलीत जाऊन संस्कृत व्याकरणाच्या तासाला येण्याची सूचना केली व तो व्याकरणाचा वर्ग तीन तास घेतला तरी विद्यार्थी कंटाळले नाहीत. त्यांनी वेदावर वक्तव्य करून योगाचे तत्त्वज्ञानावर निरूपण केले. त्या दिवशी विश्रांतीचे वेळात त्यांनी देशाचा उत्कर्ष व अपकर्ष या संबंधात सहकाऱ्यांशी चर्चा केली व ते उपासनेसाठी म्हणून स्वतःच्या खोलीकडे गेले.

— आणि रात्री ९ नंतर त्यांनी महासमाधि लावली व ४० वर्षानंतर न जगण्याचे आपले भविष्य खरे केले. नरेंद्रांचे शरीर धिप्पाड व देखणे होते. शिवाय ब्रह्मचारी असल्यामुळे त्यांच्या मुखावर तेज होते.

स्वामी विवेकानंदांचा दृष्टिकोन फार व्यापक होता. देशाच्याच नव्हे तर अखिल मानवतेच्या उद्धाराची त्यांना तळमळ होती व त्याकरिता ते आमरण अत्यंत निःस्वार्थीपणे झगडले. स्वतःच्या कार्याबद्दल त्यांना अत्यल्पसुद्धा गर्व नसला तरी त्यांचे योग्य मूल्यमापन त्यांनी स्वतःच केले होते. ते म्हणतात, "सुमारे १५०० वर्षे पुरेल एवढे काम मी केले आहे."

" आत्मबल हेच माझ्या धर्माचे सार आहे. ज्या धर्माने अंतःकरणात बल प्राप्त होत नाही, तो धर्मच नव्हे ! बल हाच माझा धर्म, बलापेक्षा श्रेष्ठ काहीच नाही ! " भारताच्या वैदिक तत्वज्ञानाची पताका जगभर फडकावणाऱ्या स्वामी विवेकानंदांची धर्माबाबतची ही कल्पना आहे. " बलशाही व्हा ! " हा त्यांचा संदेश तर विद्यार्थीमित्रांना अति उपयुक्त असा आहे. " सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. उच्चनीचपणा नाही. सदाचरणाने वागावे. चोरी चहाडी करू नये. खोटे बोलू नये. परोपकार करावा. परस्परांस सहाय्य करावे " ही हिंदुधर्माची तत्वे आहेत. 'ईश्वरप्राप्तीचा सोपा मार्ग जसा या धर्मात आहे तसा इतर धर्मांत नाही' असेहि प्रतिपादन ते करीत असत. सर्व भारतीय संतांच्याबद्दल त्यांना अतीव आदर होता.

नरेंद्रांच्या उपदेशाने या धर्मांतराची लाट बंद झाली. अशा तऱ्हेने प्रचारकार्य करीत करीत ते राजपुतान्यात गेले असता तेथील राजास नरेंद्रांचा उपदेश फार आवडला, व तेथे त्यांनी त्यांचा सत्कार करून नरेंद्रांना विवेकानंद म्हणजे चांगल्या विचारात सुख मानणारा असे नाव दिले. नंतर विवेकानंद अमेरिकेत गेल्यावर त्यांचा भगवा झगा व फेटा असा पेहराव पाहून टवाळांनी त्यांची चेष्टा केली. पण सर्व धर्मीयांच्या परिषदेत जेव्हा त्यांचे भाषण झाले तेव्हा या विवेकानंदांचे नाव सर्वतोमुखी झाले. त्यांनी आपल्या भाषणास " माझ्या अमेरिकन बंधु-भगिनींनो " अशी सुरुवात केली. त्या पाश्चात्यांना ती फारच आवडली. अमेरिकेत त्यांची खूप भाषणे झाली. प्रत्येक भाषणाच्या वेळी सभास्थान अगदी फुलून जाई. तत्कालीन अमेरिकनांना विवेकानंदांच्या व्याख्यानांचे जणू वेडच लागलेले होते, त्यांच्या भाषणाची पुस्तकेहि झाली. अमेरिकेशिवाय फ्रान्स, जपान, इंग्लंड, वगैरे देशातहि ते जाऊन आले. हिंदु लोक म्हणजे रानटी, त्यांना बुद्धि नाही, ही इंग्लंडमधील लोकांची समजूत विवेकानंदांनी ढासळून टाकली.

स्वामीजींनी जगाला ध्येयवाद सांगितला अन् तो व्यवहारात प्रत्यक्षात उतरण्यासारखा होता. ' रामकृष्ण मिशन ' या त्यांनी स्थापिलेल्या संस्थेने जनसेवेचे जे कार्य केले ते परकी सरकारकडूनही गौरवास पात्र ठरले. सन १८९९ साली कलकत्यात प्लेगाने हाहाःकार उडवला होता. स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली त्यावेळी मिशनने जे कार्य केले ते अपूर्व होते. स्वामीजी स्वतः गल्लीच्या वस्तीत जाऊन राहिले, व त्यांनी मिशनच्या कार्यकर्त्यांना कार्यप्रवृत्त केले, उत्तेजन दिले. कलकत्याच्या चार जिल्ह्यातील दरिद्री वस्तीतून घाणीचे उच्चाटन करण्याची मोहिम मिशनने हाती घेऊन गाड्या भरभरून घाण-कचरा काढण्याचे कार्य पार पाडले; आणि तेथील घर न् घर जंतुरहित करण्याचा यत्न केला. या सर्व कामांवर स्वामीजी स्वत. देखरेख करीत होते.

विवेकानंदांचे कार्य म्हणजे एकोणिसाव्या शतकातील हिंदुधर्माच्या नव्या मन्वंतराचा इतिहास होय. आपला हिंदुधर्म हा अनेक दिव्यातून पार पडला आहे. थोर तत्ववेत्त्यांनी आणि सुधारकांनी आपल्या सुंदर व सत्य विचारांची या धर्मभांडारात भर टाकली आहे. " हिंदुधर्माइतकी उदार तत्त्वें सांगणारा दुसरा धर्म नाही. पण हिंदुधर्माइतके प्रत्यक्ष आचारात अनुदार लोकहि अन्य धर्मांत सापडणार नाहीत " असेहि ते प्रतिपादन करीत असत.

स्वामीजी मानवतेचे उपासक होते, पण त्यांचे देशप्रेमहि तसेच होते. पूर्वग्रहदूषित दृष्टि सोडून भारतास समजून घेण्यासाठी परत या असे त्यांनी आपल्या परदेशी शिष्यांना वारंवार सांगितले. भारतीय तत्वज्ञानाने सांगितलेली ध्येये व कल्पना प्रामाणिकपणाने समजून घ्या असे ते नेहमी सांगत. हजारो वर्षे अनेक आघात सहन करून आणि अनेक प्रयोग-दिव्यातून तावून निघाल्याने भारतीय संस्कृती विकसित झाली असून ती अतुलनीय ठरली आहे असे ते म्हणत. मानवतेची उच्च पातळी भारतीय संस्कृतीने गाठली आहे, असा त्यांचा विश्वास होता.

विश्वप्रेमाने स्वामींचे हृदय भरलेले होते. विश्वात रहाणाऱ्या प्रत्येक मानवाला ते आपलाच मानत असत. सर्वांबद्दल त्यांना सारखीच ममता वाटे. हा साधू, हा पापी असा भेदभाव नव्हता. जगातील दुःखांनी ते व्यथित होत. निरनिराळ्या धर्मांच्या अनुयायांत स्नेहसंबंध वाढावेत म्हणून त्यांनी अपरंपार यत्न केले. निरनिराळे धर्म हे एकाच शाश्वत धर्माची रूपे होत असे त्यांना वाटे.

उपनिषदावर स्वामीजींची भक्ती फार. त्याचीच ते शिकवण देत. कारण बलोपासनाहि उपनिषदाची प्रमुख शिकवण आहे. वेदाची शिकवण, वेदांताचे सार उपनिषदात आहे असे ते म्हणत. आत्मविश्वासाचे तर स्वामीजी मूर्तिमंत प्रतिक होते. देवाप्रमाणे त्यांना आत्मविश्वास वाटत असे. ते म्हणत, "या जगाचा इतिहास म्हणजे आत्मविश्वासाने काम करणाऱ्या थोड्या व्यक्तिंचाच इतिहास आहे. त्यांच्या आत्मविश्वासाचे व्यक्तस्वरूप म्हणजे इतिहासाच्या घडामोडी! स्वामीजी नेहमी म्हणत, "तुम्ही काहीही करू शकाल. काहीच अशक्य नाही. आत्मशक्तिचा वापर करता आला नाही की तुम्ही अयशस्वी होता. आत्मविश्वासच नष्ट झाला की मनुष्य संपला. "

ते पुढे म्हणत, "—आत्मविश्वास प्रथम वाढवा व नंतर ईश्वरावर भार टाका. मूठभर बलशाली माणसे जगाला हालवू शकतील. आम्हाला संवदेनाक्षम मन हवे. तीव्र आकलन शक्ति पाहिजे आणि काम करायला अंगात-दंडात ताकतही पाहिजे. "

स्वामीजी सत्याचे आग्रही होते. ते शिष्यांना नेहमी सांगत, "सत्य कथनाच्या बाबतीत तडजोड वृत्ति नको, रंगसफेती नको. प्रेताला पुष्पाच्छादन कशाला? कुणाचा रोष होईल, रूढीच्या विरूद्ध होईल. म्हणून सत्य लपवू नका, त्याला धोका पत्करून वाचा फोडा, सत्य कथन निर्भयतेने करा. मग तुमच्या तथाकथित प्रतिष्ठेला बाध आला तरी डरू नका, किंवा तेढ निर्माण होईल म्हणून स्वस्थ राहू नका," सत्याच्या उपासनेचा चमत्कार सांगताना स्वामीजी म्हणतात, "सत्याला डावलण्याचा मोह होत असताना तुम्ही त्याला चिकटून राहिलात तर तुम्हाला एक दैवी बळ प्राप्त होईल; आणि असत्य कथा करणारे लोक तुमच्यापुढे खरे तेच सांगतील."

मायदेशी परत आल्यावर स्वामीजींनी रामकृष्ण मठाची स्थापना केली. कलकत्याजवळ बेलूर येथे व हिमालयात मायावती येथे दोन प्रचंड मठ स्थापून प्लेग, दुष्काळ वगैरेत मदत करण्याची व्यवस्था त्यांनीच केली. अमेरिकेची पुन्हा सफर करावी असा त्यांचा मानस होता, परंतु त्यांचे शरीर मधुमेहाने पोखरलेले होते, पूर्वीचा उत्साह ओसरलेला होता, व भाषणातील तेजही कमी झाले होते. तेव्हा सिलोनहून परत फिरून १९०२ मध्ये त्यांनी बेलूरला समाधि घेतली. रामकृष्ण परमहंसांचे समाधिजवळ त्यांची समाधि आहे. रामकृष्णांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रसारासाठी यांनी वेदान्त मठ बेलूर या संस्थेची स्थापना केली. आज रामकृष्ण मिशन व आणखीहि कित्येक संस्था त्यांच्या तत्वज्ञानाचा जगभर प्रसार करीत आहेत. अद्वैताश्रम ही मायावती येथील प्रमुख संस्था प्रसिद्धच आहे.

'प्रबुद्ध भारत' नावाचे मासिकहि त्यांच्या तत्वज्ञानाचा प्रचार करण्यासाठी प्रसिद्ध होत होते. शिवाय वेदांत केसरी 'मॉर्निंग स्टार' (इंग्रजी), 'उद्‌बोधन,' 'विश्ववाणी' (बंगाली), 'समाधन' (हिंन्दी), 'श्री रामकृष्ण विझाय' (तामिळ), 'प्रबुद्ध केरळम्' (मल्याळम्) इ. नियतकालिकातून त्यांच्या तत्वज्ञानाचा प्रचार चालू आहे. 'दि व्हॉइस ऑफ ट्रूथ' (मलाया), दि 'मेसेज ऑफ दि इस्ट' (अमेरिका), 'वर्क' (ब्राझील), "थॉट" (पोर्तुगाल) या विदेशी वृत्तपत्रांतून त्यांच्या तत्वज्ञानाचा आंतरराष्ट्रीय प्रचार होतो. सिलोनला विवेकानंद सोसायटी अनेक शाळा चालविते, ब्रह्मदेशात विवेकानंद सोसायटी अनेक रुग्णालये चालविते, अमेरिकेत सान फ्रांसिस्को, क्रेसन्टा, सॅन ॲन्टन व्हॅली, पोर्टलॅंड, बोस्टन, न्यूयॉर्क आदी स्थानी त्यांचे सोसायटीच्या शाखा आहेत. पोर्तुगालमध्येहि अनेक शाखा आहेत. पोर्तुगीजमधे त्यांच्या अनेक ग्रंथांचे अनुवादहि झालेले आहेत.

विवेकानंदांचे नाव माहित नाही असा मनुष्य विरळा. स्वामीजींच्या

चरित्राचे प्रत्येकाने मनन करावे. त्यांच्या तत्वाचे आचरण करावे. कारण अनेक विवेकानंद निर्माण झाले तरच जगाचे भवितव्य उज्वल आहे. त्यांनी स्वामीजींनी आपणास केलेल्या उदात्त उपदेशाची जाणीव करून घेऊन त्यांनी सांगितलेली तत्वे आपण आचरणात आणण्याचा प्रयत्न करू या. ●

गाठी भेटी—३५

## श्रीसाईबाबा संस्थानचे मुख्य गवई

# श्री. गजानन विश्वनाथ जोशी

**सदानंद चेंदवणकर**
'राधा-माधव' १२४/४०५५ टिळकनगर,
चेंबूर, मुंबई ८९



शिरडीच्या श्रीबाबांच्या समाधिमंदिरात अगदी पहिल्या, सकाळी पाचाच्या काकड आरतीपासून तो रात्री दहावाजताच्या शेजारती पर्यंतच्या सर्व आरत्यांच्या वेळी तबल्याची किंवा पेटीची साथ देण्यासाठी तसेच उत्सव प्रसंगी कलाकार पाहुण्यांचा परिचय करून देणारी एक उंच बांध्याची, सड-पातळ देहयष्ठीची वयोवृद्ध पण चटपटीत व तुरतुरीत अशी व्यक्ती साईभक्ताना दिसून येते. दुपारच्या वेळी हीच व्यक्ती समाधीमंदिरात श्रीबाबांच्या समोर मृगासनावर पोथीचे वाचन करण्यात दंग असते तर सूर्यास्ताची आरती संपल्यावर साईभक्तांच्या संगीत कार्यक्रमाच्या हजेरीच्या वेळी हीच व्यक्ती रात्री दहावाजताच्या आरती पर्यंतच्या सर्व कार्यक्रमांचे संचालन करीत असते. अशा प्रकारे कार्यरत राहून श्रीसाईबाबांची दिवसभर सेवा कार्य करीत असलेल्या या व्यक्तीचे नाव आहे श्री. गजानन विश्वनाथ जोशी. 'संस्थान गवई' या नावाने ते ओळखले जातात.

श्री. जोशी बुवा हे, मराठवाड्यातल्या बीड जिल्ह्यातले. तेथल्या मोरगावी त्यांचा जन्म १४ आक्टोबर १९११ रोजी झाला. त्यांच्या मातोश्रींचे नाव मालनबाई. त्या सुशील व सद्‌गुणी होत्या. छोट्या गजाननाचे वडील लहानपणीच परलोकी गेल्याने याच गुणीमातेने आपल्या एकुलत्या एक लहानग्या गजाननाचा सर्वतोपरीने सांभाळ केला. वडील अंजनवती येथे भिक्षुकी करीत असत.

वयाच्या सहा ते नऊ वर्षे पर्यंत छोट्या गजाननाचे प्राथमिक शिक्षण अंजनवतीस झाले. पुढील वयाची नऊ ते चौदा वर्षेपर्यंत शिक्षण अंजनवतीलाच असलेले त्यांचे चुलते श्री. शंकरशास्त्री जोशी यांनी केले. वयाच्या पंधराव्या वर्षी गजाननराव पंढरपूरला गेले व तिथे ते वयाची २५ वर्षेपर्यंत म्हणजे तब्बल दहा वर्षे होते. तरुणपणाच्या या काळात त्यांनी संस्कृतचे ज्ञान उत्तम संपादन केले. तसेच श्री. पांडुरंगाच्या सहवासात राहून गायन, तबला व किर्तन या आपल्या अंगी असलेल्या उपजत कलांचा चांगलाच विकास केला. इतका की संस्कृतचे ज्ञान व संगीत कला यांचा त्यांना भावी आयुष्यात सदैव उपयोगच होत आला. संस्कृतच्या ज्ञानासाठी गजाननरावांना पंढरपूरचे तत्कालीन विद्वान पंडित श्री. भैय्यापंत शास्त्री पराडकर यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. केशवशास्त्री विप्र या महापंडितांचा तर त्यांना शुभ आशिर्वादच लाभला. प्रकांडपंडित भगवानशास्त्री धारूळकर यांनी तर आपला वरदहस्तच त्यांच्यावर ठेवला. अशा प्रकारे या तीन संस्कृत विद्वज्जनांकडून भरपूर मार्गदर्शन त्यांना लाभले. व मनापासून विषयाचा सांगोपांग अभ्यास त्यांनी केला. पाठांतरात तर त्यांची विलक्षण प्रगति दिसून आली. संस्कृतच्या अध्ययनाबरोबरच गजाननरावांनी श्री. जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांचेकडे संगीताचा शास्त्रोक्त अभ्यास केला; व श्री. दत्तोपंत मंगळवेढेकर यांचेकडे त्यांनी- तबलावादन कलेचे ज्ञान घेतले.

ज्ञानार्जन केल्यावर गजाननरावांनी पंढरपूर सोडले व ते पुन्हा मराठवाड्यात आले. वयाची २५ ते ३४ वर्षेपर्यंत ते मराठवाड्यात ठिकठिकाणी किर्तन-प्रवचने करीत हिंडले. त्यांच्या कीर्तन प्रवचनाचे विषय ऐतिहासिक, पौराणिक व संतचरित्रावर आधारभूत असत. शिरूर, आलगाव, कोमापूर, सकलांबा, राक्षसभुवन, पिंपळगाव पैठण इ. ठिकाणी तर त्यांची किर्तने रंगात होऊ लागली. त्यांच्या पुराण कथनाचा बोलबाला कोपरगावापर्यंत झाला; व त्यामुळे वयाच्या ३५ साव्या वर्षी म्हणजे १९४५ साली श्री. जनार्दनपंत जोशी मोहोजकर यांनी बोलावल्यावरून जोशीबुवा कोपरगावी आले. १९४५ च्या जुलैपासून पुढे सहा महिनेपर्यंत कोपरगावच्या मुरलीधर मंदिरात जोशीबुवांनी पुराणांचे वाचन केले. या एवढ्या पुण्याईचाच परिणाम म्हणून की काय १ जानेवारी १९४६ पासून कोपरगावच्या श्रीमान

गोकुळचंदजी विद्यालयात संस्कृत शिक्षक म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली, व त्या शाळेत जोशीबुवा चार आठ वर्षे नव्हे तर तब्बल चोवीस वर्षे पाच महिने व सात दिवस संस्कृतचे अध्यापक म्हणून होते. ८ जून १९७० रोजी ते तिथून सेवानिवृत्त झाले. आपली अध्यापकाची नोकरी त्यांनी तिथे इमानेइतबारे केली याबद्दल त्यांचा त्यावेळी गौरव करण्यात आला. जोशीबुवांच्या अध्यापन मार्गदर्शनाखाली शिकलेले अनेक विद्यार्थी आज नगर जिल्ह्यात विखुरलेले आहेत. पंढरपूरला असताना जोशीबुवांनी १९३३ साली 'काव्यतीर्थ' ही संस्कृतची उच्च परीक्षा दिली व त्यामध्ये उत्तीर्ण झाल्यावर ते 'शास्त्रीबुवा' या नावाने जे ओळखले जाऊ लागले ते अगदी आजतागायत. योगायोगाची गोष्ट कोपरगावच्या शाळेतून सेवानिवृत्त झाल्यावर शिर्डीच्या साईबाबा संस्थानमध्ये त्यांना साजेलशी एक जागा रिकामी होती. रिकामी होती असे म्हणण्यापेक्षा जोशीबुवांच्याच पात्रतेची एक व्यक्ती संस्थानला हवी होती व त्यासाठी म्हणून बुवांनी एक निवेदन अर्ज केला व सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे चटकन तो मान्य होऊन जोशीबुवा संस्थानध्ये १ जून १९७१ रोजी आपल्या नूतन संस्थान गवई या कामगिरीवर हजर पण झाले. संस्थानच्या कचेरीतील एक पदाधिकारी श्री. रामचंद्रपंत खोत यांचे त्यांना येथे आणण्याच्या कामी बरेचसे सहाय्य झाले याचा जोशीबुवा कृतज्ञतेने उल्लेख करतात.

गेली सात वर्षे जोशीबुवा संस्थानची व श्रीबाबांची तनमनाने सेवा करीत आहेत. श्री. जोशीबुवांचा विवाह शिरूर भालगावच्या कु. तानुबाई कापटे यांच्याशी झाला. व विवाहोत्तर त्या सौ. सरस्वती जोशी म्हणून मिरवू लागल्या. जोशी दांपत्याला दोन कन्या व एक पुत्र अशी अपत्यसंपदा असून कन्यांचे विवाह त्यांनी उरकून टाकून जबाबदारी पार पाडली आहे. त्यांचे चिरंजीव श्री. विश्वनाथ (अरुण) नगरला महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसीटी बोर्डमध्ये नोकरीस आहेत. शास्त्रीबुवांचे दैनंदिन जीवन अगदी काटेकोर व शिस्तबद्ध असे आहे. वाचनाची त्यांना अती आवड आहे. पण त्यांच्या वाचनात कथा-कादंबऱ्या मुळीच येत नाहीत. ते साहित्य त्यांना आवडतही नाही. संतवाङ्मय, पुराणे इ० चे ते आवडीने वाचन करतात. या वयातही त्यांची उमेद वाखाणण्यासारखी आहे. आज संस्कृत भाषामृत भाषा म्हणून ओळखली जाते पण असे जरी असले तरी या भाषेत ते आणखीन प्रगती करून मृत भाषेला जागृती देतील व त्याबरोबरच श्रीसाईबाबांची व पर्यायाने श्रीसाई-संस्थानची अधिक तत्परतेने सेवा करतील अशी शुभेच्छा करतो.

# युगावतार श्रीसाईबाबा : ११

( श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्याने )

अनुवादक :- श्री. चंद्रकांत दामोदर सामंत
डोंगरे मॅन्शन, ताडदेव, मुं. ७

● आपल्या भारतात अनादिकालापासून गुरुचे महात्म्य व स्थान हे सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. गुरु हे ईश्वरासमान आहेत असेच सर्वत्र मानले जाते. प्रत्येक साधकाला गुरुची अत्यंत आवश्यकता असते. कारण सद्गुरु हेच मोक्षदाते परमेश्वर होत !

वास्तविक पाहता, जगाच्या कल्याणासाठीच अवतार घेतलेल्या श्रीसाईबाबां-सारख्या विभूतीला गुरुची काय आवश्यकता असणार? पण तरीसुद्धा उपलब्ध असलेल्या माहितीनुसार जगरहाटीप्रमाणे श्रीबाबांनी ज्ञानप्राप्तीसाठी गुरु केले होते. त्यांच्या तोंडून स्वतःच्या गुरुची महती भक्तमंडळींना वारंवार ऐकावयास मिळत असे. सद्गुरुच्या ठायी अचल श्रद्धा ठेविल्याने, त्यांचे सर्वतोपरी आज्ञापालन केल्याने इच्छित गोष्टी प्राप्त होतात. गुरु हे दयेचे भांडारच आहेत म्हणाना ! त्यांचे सदैव स्मरण ठेवणाऱ्या भक्तांना संकटसमयी वाचविण्यासाठी ते नेहेमी धावून येतात.

देह धारण केला होता त्याकाळात व देहत्यागानंतरही भक्तांच्या हाकेला ओ देऊन त्यांची संकटे निवारण केल्याची अनेक उदाहरणे श्रीसाईनाथांच्या चरित्रात वाचावयास मिळतात.

१९६२ सालची गोष्ट आहे ही. अहमदाबादचे रहिवासी श्री. दलपतराय पुरोहित, श्रीसाईशरणानंद महाराज व एक वृद्ध भगिनी अशी तिघे मिळून बद्री-केदारच्या यात्रेला निघाले. मथुरेला पोहोचल्यानंतर तेथून हरिद्वारला बस अथवा आगगाडीने जाता येते. आगगाडीत मनस्वी गर्दी व तशात उन्हाळ्याचे दिवस. म्हणून मंडळींनी बसनेच प्रवास करण्याचे ठरविले. पण बससाठी रिझर्व्हेशन करणे आवश्यक होते. म्हणून दलपतभाई त्याचदिवशी रात्री बसस्टँडवर दुसऱ्या दिवशी हरिद्वारकडे जाणाऱ्या बसची चौकशी करण्यासाठी गेले. तेथे थोड्याच वेळापूर्वी हरिद्वारहून मथुरेला आलेल्या बसच्या कंडक्टरशी चौकशी करण्यास सुरुवात करताच त्या कंडक्टरने त्यांची पूर्वी ओळख असल्यासारखे संभाषण चालू केले व विचारले, "काहो, तुमच्याबरोबर प्रवासात एक स्वामीजी व एक वृद्ध स्त्री आहेत का ?" दलपत-

भाईंनी होकारार्थी उत्तर दिल्यावर त्या कंडक्टरने स्वतःच्या खिशातून बसची तीन तिकीटे काढून दलपतभाईंना दिली व म्हटले, " फकिरासारख्या दिसणाऱ्या एका माणसाने काल अलिगढ येथे ही तिकीटे रिझर्व्ह करून, तुमच्या वर्णनाचा इसम रात्रीच्या आठ वाजण्याच्या सुमारास तिकिटांची चौकशी करावयास येईल त्याला ती दे असे मला बजावून सांगितले आहे. "

दुसऱ्या दिवशीच्या प्रवासाची गोष्ट श्री. दलपतभाई इतरांकडे बोलले नसताना त्यांच्या तिकिटांची आगाऊ खरेदी करणारी "फकिरासारखी" दिसणारी व्यक्ति श्रीबाबांशिवाय कोण बरे असू शकेल ? ●

# श्रीसाई—प्रसाद

—डॉ. अनिल जायस्वाल
द्वारा श्रीसाई—क्लिनिक,
चितारओळ, नागपूर—२

वाचकांनो !

● आपल्या सर्वांस माहीतच आहे की श्रीसाई—समर्थांच्या निस्सिम भक्तांपैकी एक होते परमपूज्य नानासाहेब चांदोरकर. त्यांचे पूर्ण नाव नारायण गोविंद चांदोरकर होते. ते खानदेशातील जामनेर नामक तालुक्याचे मामलेदार होते. परंतु त्या सुशिक्षित, विद्वान गृहस्थांची श्रीसाई-चरणी जडलेली श्रद्धा इतक्या अगाध स्वरूपाची होती की त्याची सर कमीत-कमी या ओळी लिहून आपणासमोर सादर करणाऱ्या अल्पमती पामरात येणे-फार काय-फारच कठीण आहे; असे म्हटल्यास मुळीच अतिशयोक्तीचे होणार नाही. संदर्भास्तव एकच उदाहरण दिल्यास वाचकांची याविषयी निश्चित खात्री पटेल.

एकदा हे नानासाहेब चांदोरकर ठाणे शहराच्या स्टेशनाजवळील मार्गाने जात असताना वांद्र्यास राहणारे एक भाविक सद्गृहस्थ त्यांना भेटले. परगावी मुलीची तब्येत गेल्या तीन दिवसापासून फारच बिघडल्यामुळे श्रीबाबांची उदी घेऊन पाठविण्यासाठी त्यांनी चांदोरकरांस आकस्मिकरित्या स्टेशनाजवळच गाठले. परंतु दुर्दैवाने त्यावेळी श्री. नानासाहेबांजवळही अंगारा नव्हता. तरीपण स्वतःस असणाऱ्या श्रीसाई समर्थांवरील श्रद्धेवर त्यांचा अतूट विश्वास होता. रस्त्यावरील

चिमूटभर मातीच उचलून, ते मागे वळले. ती मातीच जणूकाही ' द्वारकामाईची-उदी ' आहे व स्वतःची बायकोच, सदरहू गृहस्थाची ' ज्वरग्रस्त कन्या ' आहे-अशा मंगलमय निःस्वार्थ भावनेने त्यांनी श्रींचे स्मरण करून बायकोच्या कपाळी ती माती लाविली.

काय आश्चर्य म्हणावे ! तो गृहस्थ जेव्हा मुलीच्या सासरी पोहचला, तेव्हा त्यास तिच्या प्रकृतित बराच संतोषप्रद सुधार आढळला. तपशिलवार विचारपूस केल्यावर कन्येचा ज्वर उतरण्याचा क्षण व नानांनी बायकोच्या कपाळी, रस्त्यावरील निव्वळ मातीस उदी समजून श्रीसाईस्मरणोपरांत, लावण्याचा क्षण एकच निघाला. खरोखरच;

> जो जो, मज भजे, जैशा जैशा भावें ॥
> तैसा तैसा पावें, मी ही त्यासी ॥

हे श्रीसाई समर्थांच्या मंगल-मुखें निघालेले वचन-एक त्रिकाल-सत्य आहें.

सुख दुःख हे येणारे-जाणारे आहेत. तो मग आस्तिक असो वा नास्तिक. आपल्यापैकी अनेक साईभक्तांनाही सुख-दुःख लागलेलेच आहे. परंतु ज्याप्रमाणे आपण सुख आनंदाने उपभोगित असतो त्याचप्रमाणे दुःखही भोगण्यास तत्पर राहण्यास हवे. श्रीसाईवर असणारा विश्वास, दृढ-निष्ठा, श्रद्धा-सबूरी मुळीच डगमगत कामा नये. जर आपण आपले सर्वकाही त्यांच्यावरच सोपविले आहे-तर मग चिंता कशाची ? त्यांच्यावर अखंड विश्वास असू द्या. आपणास श्रीसाईचे बोल आठवत असतील. जसे वर नमूदीत केलेले वचन सत्य, तसेच पुनः. स्मरण करण्यास खाली दिलेले श्रीमुखांचे बोल सत्य माना.

> तुमचा मी भार वाहीन सर्वथा ॥
> नव्हें हे अन्यथा वचन माझे ॥

वरील वचनाची सदैव आठवण बाळगा.

> साई–भक्त झालात तर
> काय दुःख येणार नाही ?
> सर्व साईभक्त काय
> सुखच उपभोगितात ?
> नाही—असे मुळीच नाही.

परंतु ही गोष्ट मात्र खरी की साईचरणी जडलेली श्रद्धा जर तीव्र स्वरूपाची असेल तर दहा वर्ष भोगावे लागणारे दुःख व कष्ट ते अवघ्या दहा दिवसातच संपुष्टात आणतात.

आपल्या लेकरांना दुःख देणे;
माऊलीस कधी तरी आवडेल काय ?

कधीच नाही. परंतु प्रारब्धानुसार पूर्वसंचित दुःख भोगणे प्रत्येकास भाग आहे.

आपली साईमाऊली तर क्षणोक्षणी आपली सहायता करण्यातच व्यस्त आहे.

आपण रात्री खुशाल झोपतो. कधी-कधी भर दुपारीसुद्धा जेवणानंतर डुलक्या घेतोच. पलंगावर आडवे होऊन पाय लांबवून खुशाल झोपतो.

परंतु श्रीसाईमाऊली रात्रंदिवस जागृत असते. आपल्या लेकरांची देखरेख सुव्यवस्थितपणे करण्यातच ती मग्न आहे. दंग आहे. म्हणूनच श्रीसाईमाऊलीच्या खालील ओळी लक्षवेधक आहेत.

शरण मज आला, आणि वायां गेला ॥
दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥

परंतु वाचक-बंधु-भगिनींनो ! आपल्यावरच जर एखादे अरिष्ट आले, विघ्न वा संकट उद्‌भवले; तर नेमक्या त्या क्षणीच श्रीसाईप्रती असणारी आपली श्रद्धा डगमगते. कधी-कधी तर दुःखाच्या डोहात लोळणारा क्रोधयुक्त साईभक्तच श्रीसाईप्रती रोषपूर्ण तुच्छ शब्दही बोलून जातो. आपण ते न ऐकलेलेच बरे. अशा भक्ताशी व्यर्थ वादावादी कदापि करू नये. वादविवाद करण्यात काय हशिल आहे ! याबाबतीत वाचकवर्ग सतर्कच असतात म्हणायचे. पूर्वजन्माच्या ऋणानुबंधाच्या परिणामस्वरूपच आपल्यापाशी कोणाचे आगमन घडते. करिता त्याच्या कुविचारावर पूर्णतः दुर्लक्ष करून व्यर्थच आपले मन दूषित करू नये. अशा प्रकारचे अंशतः आस्तिक व सदैव सुखच पदरी पडावे याकरिताच संबोधिल्या जाणाऱ्या साईभक्तांशीही आपण प्रेमानेच वागावयास हवे. दोन-एक शब्द बोलता येत असतील तर श्रीसाईमाऊलीच्या स्तुति-प्रीत्यर्थच बोलावे नाहीतर गप्प राहणेच श्रेष्ठ. परंतु त्यांचे बोचक शब्द मुळीच ऐकू नका. श्रवणेन्द्रियावरही ताबा मिळविण्याचा प्रयत्न करा.

" नळी फुंकली सोनारे ।
इकडून-तिकडून गेले वारे ॥ "

या प्रकारची कृती व्यवहारात आणणेच अशा प्रसंगी सर्वश्रेष्ठ आहे.

सद्‌गुरूरायांचे वा श्रीसाईबाबांचे स्मरण, चिंतन नाही केले तरी चालेल, परंतु गुरूनिंदा वा साईनिंदा ऐकणे महापाप आहे.

ज्याप्रमाणे प्रसादाच्या चवीकडे आपण सदैव दुर्लक्ष करून ते पूर्ण श्रद्धायुक्त अंतःकरणाने ग्रहण करतो, त्याचप्रमाणे सुख-दुःखासही सम मानून हा जणूकाही श्रीसाईसमर्थांचाच प्रसाद असून तो स्विकारणे आपले परम कर्तव्य आहे. प्रसादाच्या

चवीकडे कधीतरी आपण लक्ष देतो काय ? आंबट आहे की खारट, गोड आहे की तुरट ? कधीच नाही. मुळीच नाही. याच श्रीसाईप्रसादासाठी आपण आरती नंतर शिर्डी येथील श्रींच्या समाधीमंदिरासमोरील पटांगणात रांगेत उभे राहतो. जे काही व जसे काही आपणास प्राप्त झाले, त्यासच आपले सुदैव समजून स्वीकारतो व ग्रहण करतो. नेमके त्याचप्रमाणे आपण सर्व साईभक्त दुःख-सुख, भोग व उपभोगण्याकरिता रांगेत लागलेले आहोत. जे काही प्रसादस्वरूप आपल्या वाट्यास येईल, पदरी पडेल; तेच श्रद्धापूर्वक नतमस्तक होऊन स्वीकारावे व ग्रहण करावे. त्यातच संतोष मानावा. हाच ' श्रीसाई-प्रसादा ' मागील हेतू असावा— असे वाटते.

सरतेशेवटी,

" माझ्या समाधीची पायरी जो चढेल ॥
दुःख हे हरेल सर्व त्याचे ॥ "

हे श्रीसाईबाबांचे बोल गुणगुणतच मी आपल्या सर्वांचा शुभाशिर्वाद पदरी घेतो आहे. ●

# साई साई साई !

– सौ. लीला सदाशिव पाठारे,
ओडके बिल्डिंग, मुलुंड ( पश्चिम ) मुं. ८०

● साई, साई, साई, हे उच्चारण कसं कानाला गोड लागतं नाही का ? आई, आई, आई म्हणून आईलाच हाक मारल्यासारखे वाटते. ' साईबाबा ' म्हटले की आई बाबांनाच हाक मारली आहे असे वाटते. आणि ते सहाजिकच आहे. साईबाबा म्हणजे प्रत्येकाचे आई बाबाच आहेत. त्यांच्या ठिकाणी आई आणि बाबांचा समन्वय झाला आहे. असे प्रत्येक हाक मारणाऱ्या भक्ताच्या अनुभवास येते. आईची जशी मुलावर माया असते तशीच किंबहुना त्याहून काकणभर जास्तच साईंच्या मायेची सावली त्यांच्या भक्तांवर असते.

बाबा मायाळू आहेत तसेच कठोरही आहेत. आई नाठाळ मुलाला शिक्षा करते. नंतर पोटाशी धरते तसेच बाबाही करतात. मुलांच्या मनाप्रमाणे आईने केले नाही म्हणजे मुले रागावतात, सतावतात, भांडतात. त्यांचे वर्तन अथवा मागणे

अयोग्य असल्यास आई मान्य करत नाही, बाबाही तसेच करतात मग भक्तांची श्रद्धा ढळू लागते. सबूरीचा अंत होतो. पण कालांतराने भक्ताना त्यांची चूक पटू लागते थावर दिलजमाई होते. बाबांची भक्तांकडून जास्त अपेक्षा नसते. त्यांच्या उपदेशां-प्रमाणे वागल्यास त्यांना आनंद होतो. बाबांना आर्ततेने हाक मारल्यास ते धावून येतात पण लहान मूल कांगावा करते तसे केल्यास ते दुर्लक्ष करतात. अंतःकरणापासून भक्ति केल्यावर जरूर फळ मिळते. बाबांनी म्हटलेच आहे " जो जो मज भजे जैसा जैसा भावे तैसा तैसा पावे मीही त्यासी " आणि तेही खरेच आहे. नुसते ' मनी नाही भाव आणि बाबा मला पाव ' म्हटल्यास काही प्रत्यय येत नाही.

भक्ति निष्काम निरपेक्ष पाहिजे. पण हे सामान्य माणसाला जमत नाही. मग बाबांना दोष देण्यात काय अर्थ आहे ? श्रीमंत आपल्या ऐपतीप्रमाणे अमाप खर्च करून बाबांची पूजा, सेवा करतात, व गरीब मनुष्य आपल्या कुवतीप्रमाणे करतो. बाबांना दोन्हीही सेवा सारख्याच वाटतात. उलट गरिबाची सेवा बाबांना अधिक आवडते.

बाबांच्या दरबारात गरीब श्रीमंत असा भेदभाव नाही. सर्व त्यांचीच लेकरे आहेत. त्यांची सर्वांवर समान दृष्टी आहे. जगभर बाबांचा उदो उदो चालला आहे. हे याचेच प्रतीक नाही का ? बाबांच्या दर्शनासाठी जी अलोट गर्दी होत आहे तो बाबांनी सांगितल्याचा प्रत्यय आहे. बाबांनी म्हटलेच होते की माझ्यामागे शिर्डीला मुंग्यांच्या रांगाप्रमाणे माणसांच्या रांगा लागतील. आज बाबांची भक्तसंख्या अगणित आहे. कुठेही पहा बाबांचा फोटो नाही असे ठिकाण सापडणार नाही हा बाबांवरील भक्तीचा, श्रद्धेचा परिणाम आहे. दिवसेंदिवस त्याची वृद्धि होत आहे.

एवढा अफाट पसारा आवरताना बाबांना किती कष्ट होत असतील ? पण बाबांसारख्या सिद्ध पुरुषापुढे कष्टांची काय मातब्बरी ! यावच्चंद्रदिवाकरौ भक्त सेवा करत राहतील व बाबा त्यांची दुःखे निवारत राहतील यात शंका नाही. बाबांचे आश्वासन किती सुखदायी आहे नाही ? बाबांनी अशीच कृपादृष्टि भक्तांवर ठेवावी हीच त्यांच्या चरणी नम्र प्रार्थना ! ▲

# श्रीसाईलीला

## लेखक-कवींचे चतुर्थ स्नेहसंमेलन-१९७८

श्रीसाईलीला मासिकाच्या लेखक-कवींचे चौथे स्नेहसंमेलन शिर्डी क्षेत्री रविवार दिनांक २६ व सोमवार दिनांक २७ फेब्रुवारी १९७८ या दोन दिवशी भरविण्यात येत आहे. या निमित्याने श्रीसाईलीलेच्या लेखक-कवींचा परस्पर परिचय होण्याची सुवर्णसंधि मिळणार असून यातूनच श्रीसाईलीलेच्या विकास-योजनेच्या व बाबांच्या साठाव्या महानिर्वाण सोहळयाच्या दृष्टीने भावी कार्य करण्यास अवसर मिळणार आहे.

या दोन दिवसांच्या स्नेहसंमेलनात श्रीबाबांचे जवळून दर्शन सुख, मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम, परिचय कार्यक्रम, श्रीसाईलीलेतील उपयुक्त सदरे, श्रीसाई-लीलेची आणखीन उत्तरोत्तर प्रगती कशी काय साधता येईल ? इ० विविध विषयांवर चर्चा, साकोरी दर्शन असा भरगच्च कार्यक्रम आयोजिला जाईल.

श्रीसाईलीलेच्या लेखक-कवी यांची जलपान निवास भोजनाची सारी व्यवस्था श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचेतर्फे करण्यात येणार आहे. तरी या संमेलनास हजर राहू इच्छिणाऱ्यांनी मे० रिसिव्हर साहेब श्री. का. सी. पाठक, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिर्डी जि. अहमदनगर, ता. कोपरगांव यांचेकडे ३१ जानेवारी १९७८ पर्यंत पत्रव्यवहार करून आपल्या आगमनाची सूचना त्यांना देऊन आपली जागा आरक्षित करावी म्हणजे सर्व ती प्राथमिक व्यवस्था करणे ठीक पडेल. संमेलनास येणाऱ्या लेखक मंडळींनी शनिवार दिनांक २५ फेब्रुवारी पूर्वी कृपया येऊ नये.

मुंबापुरीहून निघणाऱ्या लेखक-मंडळींनी शनिवार दिनांक २५ रोजी दुपारी ११ वाजता, १२ वाजता किंवा ३ वाजता मुंबई सेंट्रल एस. टी. स्थानक क्रमांक पाचच्या फलाटावरून सुटणाऱ्या एस. टी. बसने जावे, म्हणजे त्यांना सोयीचे होईल. १२ ची एस. टी. बस मुंबई, ठाणे, भिवंडी, शहापूर, इगतपुरी, नाशिक, सिन्नर, कोपरगांव, पोहेगाव, सावळी विहिर मार्गे शिर्डीस, नऊ वाजता पोचते. ३१ जानेवारी नंतर या स्नेहसंमेलनाचे शिर्डीच्या जागेच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार अजिबात करू नये.

| निमंत्रक | कार्यवाह |
|---|---|
| -श्री. का. सी. पाठक | -डॉ. श्रीराम दि. परचुरे |
| कोर्ट रिसिव्हर | -श्री. सदानंद चेंदवणकर |

# निबंध स्पर्धेचा निकाल

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथीच्या निमित्याने एक अभिनव निबंध स्पर्धा श्रीसाईलीला मासिकाने आयोजित केली होती. या निबंध स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यास आनंद होत आहे. या स्पर्धेसाठी निबंधाचे तीन विषय दिलेले होते. त्यापैकी—

१ ) "साई भजनी मन रमले" या विषयावर पाच निबंध आले.

२ ) "माझी साई भक्ती" या विषयावर दहा ,, ,, व

३ ) "श्री साई-एक अवतार" या विषयावर एकोणीस ,, ,,

एकूण आलेल्या ३४ निबंधांपैकी पहिल्या क्रमांकाचे दोन निबंध व एक उत्तेजनपर असे एकूण तीन निबंध गौरवपात्र ठरलेले आहेत.

१ ) प्रथम क्रमांकाचे निबंध स्पर्धक – "**माझी साई भक्ती**"

**– सौ. लुसी गंगाधर गुते**<br>'तारक,' पोलीस ग्राऊंडजवळ,<br>खारीबाव, बडोदा,

२ ) द्वितीय क्रमांकाचे निबंध स्पर्धक – "**श्रीसाई एक अवतार**"

**– सौ. सुनिता त्रि. चावक**<br>'संजय निवास,' गायकवाडवाडी,<br>विष्णूनगर, मु. पो. डोंबिवली (पश्चिम)

३ ) उत्तेजनपर निबंध स्पर्धक – "**श्रीसाई-एक अवतार**"

**– श्री. रामचंद्र केशव काळे,**<br>१७४ अभ्यंकर नगर, मु. पो. नागपूर,

वरील तिन्ही यशस्वी स्पर्धकांचे आम्ही मनःपूर्वक अभिनंदन करतो. प्रथम क्रमांकाचा निबंध याच अंकात इतरत्र प्रकाशित करीत आहोत. द्वितीय व उत्तेजनपर निबंध पुढील अंकात प्रसिद्ध केले जातील. आलेल्या निबंधांपैकी काही चांगले निबंध यथावकाश श्रीसाईलीलेतून प्रसिद्ध केले जातील.

— संपादक

निबंध स्पर्धेतील पहिल्या क्रमांकाचा निबंध

# माझी साईभक्ती

–सौ. लुसी गंगाधर गुले,
" तारक " पोलीस ग्राउंडजवळ,
खारीबाव बडोदे.

● माझी साईभक्ती ही स्वानुभवावर आधारलेली असल्यामुळे ती अचल, स्थिर आणि बुद्धीला पटल्यामुळे जणू काय बावनकशी सुवर्णाप्रमाणे चमचमत ती माझा जीवनप्रवाह सुप्रकाशित करीत आहे अशी माझी श्रद्धा आहे. आणि त्यामुळे कुठलीही बिकट समस्या हो समस्या न रहाता त्यातुन मी निःशंकपणे पार होत आहे. संसारात अडीअडचणी या येणारच परंतु माझ्या साईभक्तीच्या प्रभावामुळे कुठल्याही तऱ्हेचे त्रास न होता अगदी सहजरितीने त्यांचे निवारण होत आहे. तसे म्हटले तर प्रथम मीच श्रीसाईबाबांच्या विरुद्धच होते. पूर्वीपासूनच साधु-संतांकडे आदरभावनेने पहाणे किंवा त्यांना ईश्वरासमान मानण्याकडे माझी प्रवृत्ती नव्हती. बुवाबाजीवरील लेख वाचून किंवा बालपणीही तशा प्रकारचे संस्कार मनावर न झाल्यामुळे साधू म्हणजे भोंदू असाच माझा ग्रह झाला होता. त्यामुळे ज्यावेळी माझे सासरे साईभक्तीला लागले व दर गुरुवारी इकडे असलेल्या साई मंदिरात माझ्या दोघी मुलींना घेऊन जाऊ लागले. त्यावेळी मला त्या गोष्टीचा विलक्षण राग येत असे आणि मंदिरातून आल्यावर त्या तिघांच्या साईबाबांच्या गोष्टी चालत. त्या ऐकूनही माझा अगदी जळफळाट होत असे. त्यानंतर माझ्या मुलाला परिक्षेच्या दोन, तीन दिवस आधी आलेलं आजारपण. त्यातच दिलेली बी. कॉमची परिक्षा व त्यात त्याचे पास होणे. वगैरे मी साईलीलेच्या ऑगस्ट १९६२ च्या अंकात " बाबा म्हणजे एक जागृत दैवत " या सदराखाली सविस्तर दिले आहे. आणि तेव्हापासून माझ्या साईभक्तीला प्रारंभ झाला.

मी एवढी साईबाबा विरुद्ध असता त्यांनी मला एखाद्या तृणपात्याप्रमाणे नमविले तेहुद्धा नकळत. हे लक्षात आलं की माझी मीच अगदी आश्चर्यचकित होते. दिवसेंदिवस माझी साईभक्ति दृढ होत आहे. कोणाचे अनुभव ऐकून किंवा वाचून किंवा उत्तरोत्तर बाबांचे वाढते वैभव पाहून मी त्यांच्या भक्तिमार्गाला लागले नाही तर मी स्वतः अनुभवल्यामुळे मला त्यात विशेष आनंद वाटत असतो.

माझ्या सासऱ्यानी सुरू केलेले साईलीला मासिक अजून चालू आहे. त्यातील "बाबांच्या लीला" या सदराखाली येणाऱ्या भक्तांच्या अनुभवांचे बोल वाचून व

बाबांनी अमक्या रूपाने येऊन दर्शन दिल्याचे वाचून मीही गेल्या अधिक श्रावणाच्या बुधवारी बाबांच्या तसबिरीसमोर उभे राहून मुक्तेच्या लडिवाळपणे म्हटलं "बाबा, सर्वांना तुम्ही दर्शन देता तर उद्या गुरुवार आहे तेव्हा मलाही तुम्ही दर्शन द्या ना. गुरुवारी तुम्ही जेवायलाच या. पण कसे याल. तर आमची जेवणे झाल्यावर. अशी अट घालण्याचे कारण जेवणाचे वेळी कुणी दारावर आलं तर यांचे म्हणणे–''चटकन त्याला काय द्यायचे असेल ते द्या आणि जाऊ द्या'' म्हणजे चटकन एखादी पोळी त्याच्या थाळीत टाकली की झालं. पण एखाद्याला जेवायला बोलावले तर कसे जमावे हे. असा प्रश्न होता म्हणून माझ्या सोयीसाठी ही अट! आम्ही सर्व एकदमच जेवायला बसत असू. दुसऱ्या दिवशी गुरुवारी आम्ही सर्व बरोबर जेवायला बसलो, मी जेवून उठताच खिडकीसमोर एक गौरवर्ण म्हातारा उभा. मी ओळखलं, 'बाबा आले' मग मी सर्व व्यवस्थित त्याना वाढलं. मला विलक्षण आनंद वाटत होता. जेवण झाल्यावर इतरांच्या अनुभवाप्रमाणे तो "म्हातारा" नंतर अदृश्य झाला नाही. तर आज तीन महिने ते दर गुरुवारी आम्ही जेवून उठलो की येतात आणि मी त्यांना "बाबा" समजून जेवण देते. एकतर मी बोलवले तेव्हाच ते आले आणि तेसुद्धा माझ्या अटीप्रमाणे. मग एखाद्या गुरुवारी जरी आम्हाला जेवायला उशीर झाला तर तेही उशिरा येतील. आमच्या जेवणाआधी अजूनपर्यंत केव्हाच नाही. मी त्यांना बाबाच समजते.

बाबांच्यावर माझी इतकी श्रद्धा बसली आहे की, ते मला माझे पालनकर्ते, रक्षणकर्ते, हितकर्ते तेच आहेत असं वाटत आणि प्रत्येक गोष्ट विश्वासाने त्यांच्याजवळ सांगितली की ते बरोबर मार्गदर्शन करतात. साध्यासुध्या गोष्टीतही त्यांचा मदतीचा हात असतो. एकदा आम्ही असेच ठाण्याहून मुंबईला जात असता वाटेत माझी नणंद भेटली. तिला मी सांगितले की, "उद्या आम्ही बडोद्यास जाणार." त्यावर तिने विचारले की, "तुमचे रिझर्वेशन झालं आहे काय?" तर मी म्हटले, "नाही, आम्ही तसेच जाणार." त्यावर ती लगेच म्हणाली, "कसं शक्य आहे हे–आठ दिवसापूर्वी मी बडोद्यास गेले होते. गाडीला विलक्षण गर्दी असते. तुम्ही रिझर्वेशनशिवाय जाऊ नका." तर मी म्हटलं "आमचे रिझर्वेशन बाबा करतील."

ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी आम्ही बडोद्यास येण्यास निघालो. गाडी सकाळची होती. आणि ती स्टेशनात उभीच होती. आम्ही एका डब्यात शिरलो तर दोन तरुण मुले एका बाकावर एक टॉवेल पसरून दोन टोकाला दोघे बसली होती. आम्ही तिकडे बसायला जाताच ती म्हणाली, "आमची माणसे येणार आहेत, त्यांच्यासाठी जागा ठेवली आहे. यांनी सांगितलं

की अशी जागा तुम्हाला अडवून ठेवता येणार नाही. कोणी येईल तेव्हा बघू ''
मी गमतीने त्या मुलास म्हटल, " अरे, येणारी माणसं आम्हीच. आमच्यासाठीच
ही जागा राखून ठेवली आहे '' त्याने मुकाट्याने टॉवेल काढून घेतला, आणि
आम्ही दोघे व आमची मुलगी असे तिघे आरामात तिथे बसलो आणि गंमत अशी
की गाडी सुटावयाची वेळ झाली तरी कोणी आलं नाही इतकंच काय पण ती दोघेही
उतरून गेली. आहे की नाही बाबांची प्रचिती ?

पूर्वी मी ज्यावेळी साईभक्ती करीत नव्हते त्यावेळी माझ्या मुलांना मी शाळेच्या ट्रिप्सला कधीच पाठवत नसे. न जाणो काही अपघात झाला तर अशी भीति वाटत असे. पण माझ्या धाकट्या मुलीच्या वेळी मी बाबांची भक्ति करीत असे त्यामुळे तिला कुठल्याही ट्रिपला जाण्यास मी प्रतिबंध केला नाही. कारण माझी खात्री असे की, बाबा आहेत ते तिला संभाळतील आणि त्या मुलीने दिल्ली, दार्जिलिंगपर्यंत शाळा, कॉलेजच्या ट्रिप्स केल्या पण माझे मन निश्चिंत असे. केवळ बाबांच्यामुळे ! नाहीतर पूर्वी माझे मन मुलांच्या बाबतीत अगदी बेचैन असे. ती कुठे बाहेरगावी गेली की–परंतु आता बाबांचा मला केवढा आधार वाटतो तो जे कोणी बाबांच्यावर श्रद्धा ठेऊन असतील त्यांनाच ते कळेल. खरंच बाबांच्या सारखे जागृत दैवत अन्य नाही. मला जमेल तशी त्यांची पुजा करते त्याचेही मोठे अवडंबर नाही. मात्र साई-सप्ताह मी पुष्कळ केले आणि अलिकडे एक अध्याय वाचल्याशिवाय मी झोपत नाही. त्यामुळे मानसिक विश्रांती मिळते.

श्रीबाबांच्याविषयी कितीही लिहिलं तरी ते थोडंच आहे. खरं म्हटलं तर बाबांच्यावर संपूर्ण श्रद्धा ठेवून त्या गोष्टी ज्याच्या त्यानी अनुभवायच्या असतात. दुसऱ्याने कितीही सांगितलं तरी स्वतःला अनुभव आल्याशिवाय त्यातील खरी गोडी कळत नाही.

श्रीबाबांना वंदन–भक्ति पुरे असते. आपण सर्वांनी प्रेमभावाने व भक्तिभावाने बाबांना वंदन करू या–

# बाबांची लीला

श्री. शंकरराव जोगस,
भोजनगृह मॅनेजर
शिर्डी संस्थान

मला माहे नोव्हेंबर महिन्यात आलेला साईबाबांचा अनुभव खालीलप्रमाणे आहे.

● मी एके दिवशी आमच्या भोजनगृहासाठी लागणारी साखर खरेदी करणेसाठी भो. गृह बुकींग क्लार्क यांना कोपरगावी फॅक्टरीत पाठविले होते. त्या दिवशी सदर क्लार्ककडून रोखीची भरणा पावती रुपये ३९८०/ व सोबत मे. रिसीव्हर साहेब यांचे पत्र असे दोन्हीही गर्दीत कोपरगावी हरवले होते. ज्यावेळी सदरहू क्लार्क श्री. अरविंद नरहर कुलकर्णी हा साखरेच्या दुकानात गेला व खिशात हात घालून पाहातो तो पावती व पत्र नाही. तो बिचारा एकदम गडबडून गेला व परत शिर्डीला येऊन झालेली सर्व हकिकत त्याने सांगितली. झालेला सर्व प्रकार मी मे. रिसीव्हर साहेबांना सांगून ऑफीसला लेखी रिपोर्ट दिला.

नंतर दुसरे दिवशी संजिवनी फॅक्टरी येथील एक लॉरी आठ दिवस कोपरगाव येथे गॅरेजमध्ये दुरुस्तीला होती. ती लॉरी दुरुस्त होऊन परत फॅक्टरीला जात असता टोल नाक्यावर क्षणभर थांबली असता तेवढ्यात ती पावती व पत्र कोणीतरी त्या लॉरीत पाठीमागचे बाजुला टाकली. नंतर ती लॉरी दुध भरण्यासाठी जात असताना त्या गाडीत दुध सुपरवायझरला सापडली व त्यांनी नंतर ती वाचून पाहिली असता ही तर संस्थानची पावती व पत्र आहे व आपले गाडीत कसे काय आले? नंतर त्यांनी ती पावती व पत्र ताबडतोब सकाळी ५ वाजता शिर्डीला आणले व ते आमचेकडे दिले. आम्ही त्यांना झालेला सर्व प्रकार सांगितला सांगण्याचा उद्देश एवढाच की ती पावती व पत्र जशाचे तसे आम्हास मिळाले व नंतर आम्ही साखर घेऊन आलो. ह्या गोष्टीचे सर्वांनाच आश्चर्य वाटले. अशी आहे बाबांची लीला.

★

# वाऱ्यावरचे विचार

## ३५. घाण्याचा रेडा

–श्री. द. शं. शिरगोपीकर
वजिफदार लॉज, ठाणे

● एक होता तेली. त्याचा धंदा तेल्याचा. म्हणजे तेल गाळून ते विकणे हा उपधंदा. तोच कारखानदार, तोच दलाल, तोच घाऊक व्यापारी, तोच किरकोळ व्यापारी सगळं तोच. घरच्या ओट्यावर ताज्या तेलाने भरलेले हंडे ठेवले की झाले त्याचे दुकान. घरच्याच तेलाचे दिवे व घरचीच माणसे यामुळे व्यवस्थापनाचा खर्च फारच कमी. भुईमूग, करडई, तीळ, करंजेल वगैरे तेले तो गाळी. त्याची तेल गिरणी घरातच होती. ही जरा जुनी गोष्ट आहे. त्याकाळी आजच्या इतका यंत्राचा सुळ-सुळाट झाला नव्हता. लाकडी घाणा असे. घाण्याला बैल अगर रेडा जुंपीत. बैलापेक्षा रेडा अधिक पसंत असे. बैलाला अगदी नंदी बैलाला निदान मान हलवण्याइतकी तरी अक्कल असते. पण रेड्याला तीही नसते. अगदी निर्बुद्ध, असा प्राणी घाण्याला अधिक योग्य. ओढाळ काय कामाचा ? रेडा कसा एक सागी. डोळे बांधले व एकदा हाकलला की तो ठराविक चाकोरीतून तासन् तास थिजेपणे वाटोळा गरगर फिरत राही. घाण्याला खाद्य व रेड्याला गती दिली की झाली गिरणी चालू. गळलेले तेल हंड्यात भरणे, अधून मधून घाण्याला खाद्य ( भुईमुग, तीळ वगैरे ) देणे, रेडा थांबल्यास ( प्राणीच तो, बिचारा दमायचा ) हॅक करणे वगैरे कामे तेली स्वतःच करीत असे. क्वचित त्याची म्हणजे तेल्याची सहधर्म-चारिणीही अधून मधून हे काम करते. डोळ्यावर पट्टी बांधलेला रेडा दिवसभर ठराविक चाकोरीतून तिथल्या तिथं फिरत असतो. त्याला वाटतं आपण खूप चाललो, खूप प्रगती केली. पण डोळ्यावरील पट्टी सोडली की त्याला कळतं की आपण सूर्योदयावेळी जेथे होतो तेथेच सूर्यास्तावेळीही आहोत. ( हे मी म्हणतो. कारण रेड्याला एवढे तरी कुठून कळणार ? कळलं असतं तर त्याने मुक्या जनावराप्रमाणे गुपचूप खाली मान घालून सर्व काही मान्य केलं असतं का ? ) असा हा तेली व त्याचा रेडा.

असे हे तेली समाजातील अडाणी व अज्ञानी जनतेच्या बुद्धीवर पट्टी बांधून आपल्या स्वार्थासाठी रुढीच्या घाण्याला तिला जुंपून ठराविक चाकोरीतून चालायला लावतात. आपली प्रगती होत आहे अशा भ्रमात हा समाज शेकडो वर्षे चालत

आला आहे व आजही चालतो आहे. भोळ्या भाबड्या भाबूक जनांना देवाच्या प्रेमापेक्षा त्याची भीति अधिक वाटते. 'देव कान कापील' हा पहिला कानमंत्र बालपणीच मिळतो. भीतीच्या भुसभुशीत मातीत रूढीचे इमले उभे राहतात. याचा फायदा घेऊन हे तेली 'पहा।बुवा, नाही केलं तर देवाचा कोप होईल असा भीतीचा बडगा ते दाखवीत असतात. यामुळे रुढीच्या घाण्याभोवती बहुसंख्य जनता फिरत आहे, विज्ञानयुगाने अनेकांच्या डोळ्यावरील पट्ट्या काढल्यामुळे ते डोळस झाले आहेत, परंतु अशांची नास्तिक, बंडखोर अशी कुचेष्टा करून या तेल्यानी आपला धंदा चालू ठेवला आहे. हे तेली इतके जबरदस्त आहेत की त्यांनी सर्व उपनिषदे कोळून पिऊन स्वतःचं एक स्वतंत्र एकसूत्री उपनिषद तयार केलं आहे. ते म्हणजे 'शास्त्रात रुढी बलीयसी.' या उपनिषदाचा पगडा गीतेपेक्षाही अधिक बहुसंख्य जनांवर अजूनही आहे. रूढी, चालीरीतीच्या चाकोऱ्यातून बाहेर पडण्यास एकच मार्ग आहे. ज्याने त्यानं आपली बुद्धीची पट्टी सोडून डोळस व्हावे. नाहीतर जग म्हणतच आहे की हे हिंदु म्हणजे घाण्याचे——' ★

# जो जो मज भजे

— श्री. बी. व्ही. लांजेकर, पुणे

जो जो मज भजे जैशा जैशा भावे ।
तैसा तैसा पावे मी ही त्यासी ॥

● ही वचनावली डोळ्यापुढे आली की धर्मराजांच्या राजसूय यज्ञासाठी जमलेल्या ऋषीमुनींची परीक्षा पहाण्यासाठी भगवंतांनी धर्मराज व दुर्योधनांना पाठवलें तो प्रसंग, ती वाक्ये जशीच्या तशी आठवतात व त्यांची पुनरावृत्ती म्हणजे श्रीसाईबाबा यांनी उच्चारलेली ही वचनावली आहे.

ज्या दृष्टीने मजकडे पहाल त्या दृष्टीने माझे स्वरूप तुम्हाला दिसेल. तुम्ही माझ्याकडे मातेच्या भावनेने पहा मी मातृस्वरुपात दिसेन, पित्याच्या स्वरूपात पहा मी पितृस्वरुपात दिसेन. ज्या दृष्टीने ज्या भावनेने माझ्याकडे पहाल त्या रूपात तुमच्या समोर उभा राहीन. तुम्ही मला चांगल्या रुपात पहा मी तसा दिसेन; तुम्ही वाईट दृष्टीने पहा मी वाईट दिसेन. ज्याप्रमाणे आरशात आपण आपले रूप पहातो व निरनिराळे भाव प्रदर्शित करतो त्याप्रमाणे आपल्याला आपले स्वतःचे रूप दिसते.

सर्व सजीव निर्जीव सृष्टी त्या जीवनज्योतीने व्यापली आहे आणि त्यासाठीच पहाणारी व पाहिली जाणारी जीवनज्योत एकच असल्याने ज्या भावनेचे स्पंदन, आंदोलन जीवनज्योतीच्या अंतरात होईल ती भावना त्या स्वरूपात समोर उभी राहील. रात्रीच्या अंधःकारात सोन्याचा नागहार आपल्याला खरोखरीचा नाग दिसेल पण प्रकाशात पाहिले असता तो आपल्याला नाग हाराच्या रुपात दिसेल. सांगण्याचे तात्पर्य हे की जी भावना जीवनज्योतीच्या अंतरात प्रस्फुटेल त्या स्वरुपात वस्तू दिसेल; आणि नेमके हेच गहन तत्व मनावर बिंबविण्यासाठी या ओळी श्रीबाबांनी उच्चारल्या आहेत. भगवंतांनीसुद्धा हेच तत्व दाखवून दिले आहे. धर्मराजांची वृत्ती सात्विक होती, त्यांना सर्व ऋषी सात्विक दिसले, दुर्योधनांची वृत्ती आसुरी होती म्हणून त्यांना सर्व ऋषीमध्ये काही ना काही अवगुण दिसून आले. ते सर्व ऋषीमुनी त्यांना आसुरी शक्तीचे, दांभिक वाटले.

वरील वचनावलीतील तत्व मानवीजीवनास एक संदेश देते की तुम्ही सर्व माझ्याकडे चांगल्या सात्विक दृष्टीने पहा म्हणजे शत्रूलसुद्धा त्यांच्या काही सद्‌गुणांच्या रूपाने माझा वास आहे हे दिसून येईल, आणि मग श्रीबाबांचे हे उद्‌गार सार्थच वाटतात.

जो जो मज भजे जैशा जैशा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥

★

## कृपेने कन्या अन्
# कन्येचे कुंकू नी शुभमंगल....!

श्री. प्र. अ. पुराणिक
देशमुख वाडा, कृष्ण नगर, धुळे

● 'हम दो हमारे दो' किंवा 'इष्टपुत्रासौभाग्यवतीभव'चे ते दिवस नव्हते तर ते दिवस होते 'अष्टपुत्रासौभाग्यवतीभव' अशा तोंड भरून दिल्या जाणाऱ्या आशीर्वादाचे! प्रत्येक घरकुल श्रीमंत वा गरीब, शिक्षित वा अशिक्षित, मग ते कुणाचेही असो, आठदहा मुलांचे गोकुळच होते जणु! पाच सहा मुलं वा पाच सहा मुलींचे आपापल्या भाग्याने घर भरलेले असायचे. वडीलधारी मंडळी गप्पा टप्पात अभिमानाने सांगत--' मला किनई पाच मुलं नी पाच मुली आहेत. थोरली दोन मुलं नोकरीला आहेत. तीन मुलींची कार्ये आटोपलीत. बाकीची शिकताहेत वगैरे...वगैरे

पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचा तो काळ अधिक मुलं असणं हे जणु दौलतीचे लक्षण मानले जाई ! जरी घरं चंद्रमौळी असली तरी ! !

अर्थातच त्याला आमचेही घर अपवाद नव्हतेच म्हणा. थोरली बहीण मी व धाकटा भाऊ आम्हा तीन भावंडानंतर दुर्दैवाने माझ्या दोन बहिणी शोभा व शैला अल्पशा आजाराच्या निमित्तानं आम्हाला सोडून गेल्या ! पाठोपाठ आलेल्या या दु:खातिशयाने आमच्या कुटुंबावर एक प्रकारची शोकछाया पसरली. आईने धास्ती घेतली की आता यापुढे आपला वंशवेल बहरेल की नाही ? नऊ लेकरांच्या आमच्या आजीलाही हे खटकले यात नवल काय ? तिला हे दु:ख बघवेना. दोघी सासु-सुना धर्मवेड्या, भाववेड्याच म्हणा हवं तर, त्यांची नित्यकर्मे देवधर्म, पूजा-अर्चा, व्रतवैकल्ये, उपवासतापास पुन्हा सुरू झाले. घरात पुन्हा गुण्यागोविंदाने पाळणा हलावा म्हणून उपासना सुरू झाली. असेच काही दिवस गेले. वडिलांच्या मित्रमंडळींनी ट्रीपची एक कल्पना काढली. पण जाणार तरी कुठे ? एखाद्या तीर्थक्षेत्री जावे असे ठरले. वडिलांना वाटले आईच्या मनाचा शीण जाईल. चर्चा 'शिर्डी' गावावर स्थिर झाली. कारण त्यावेळी शिर्डीसंत श्रीसाईबाबांचा लौकीक वाढतच होता. त्यांचे चमत्कार, प्रचिती भक्तमंडळींना अधिकाअधिक आकर्षित करीत होती. 'शिर्डी' एक जागृत देवस्थान म्हणून देशात-विदेशात प्रसिद्धीस आलेले तीर्थक्षेत्र झाले होते. आम्ही धुळेकर म्हणजे त्यांच्या परिसरातीलच म्हणा हवे तर. अखेर सर्वानुमते शिर्डी ट्रीप निश्चित झाली.

ठरल्या दिवशी आई-वडील शिर्डीला गेले. मनोवांछित ट्रीप घडली. तेथील नवसाने पुढे आईचे मनोरथही बाबांनी पूर्ण केले. आम्हाला बहीण झाली. बहिणी नंतर पुन्हा एक भाऊ व एक बहीण अशी एकूण सहा पुष्पे वंशवेलीवर बहरली. आम्ही तीन भाऊ, तीन बहिणी अशी सहा भावंडे आई-वडिलांची इच्छा पूर्ण झाली. साईनाम संकीर्तनात, पूजेअर्चेत अशीच काही वर्षे भुर्रकन गेली. शिर्डी नवसाची बहीण प्राथमिक शाळेतून माध्यामिक शाळेत जाऊ लागली. पण का कुणास ठाऊक लहानपणापासूनच ती कुंकू लावीना. लावले तरी पुसुन टाकी. नवसाची पोर कुणी फारसे बोलीना. लावील पुढे म्हणून सोडून देत, वा दुर्लक्ष करीत. जबरदस्तीने लावले तर डोके दुखते म्हणून सांगे. आम्हाला काही केल्या उलगडा होईना. कुंकुवा-विना कपाळ भकास दिसे. काहीसे अशुभ वाटे. पौरोहित्य करीत आलेले आमचे घराणे, आईचा मनःस्ताप होई. साम दाम दंड' सर्व प्रयोग असफल. अखेर आमच्या आजीला एक विचार सुचला. ती म्हणाली, " सर्व धर्मांचे दैवत असलेल्या साई-नाथांच्या नवसाची ही पोर अजून बाबांच्या दर्शनाला गेली नाही हे तुम्ही सारे कसे विसरता ? घेऊन जा पोरीला दर्शनाला नि बघा बाबांची प्रचिती. तुम्हाला नाही पटायच्या आमच्या खुळया कल्पना शिक्षेशिवाय ! "

तिचे ते वाक्य सर्वांच्या हृदयाला स्पर्श करुन गेले जणु! फलप्राप्तीनंतर फल-दात्याला विसरणे बरे नव्हे! लवकरच सुयोग आला. तिला शिर्डीला दर्शनास व नवस-पूर्तीस वडील घेऊन गेले आणि अहो आश्चर्य! तिने स्वतःहून बाबांच्या समाधीच्या पादुकांवरील कुंकू लावले. सर्वांना आनंद झाला. त्या दिवसापासून ती न चुकता स्वेच्छेने कुंकू लावू लागली. डोके दुखी नाही की काही नाही. परीक्षेतही लागोपाठ यश मिळाले. टेलरिंग डिप्लोमा व एस्. एस्. सी. पास झाली.

हेमा कुंकू लावू लागली! आप्तेष्टांमध्ये एक चर्चेचा विषय झाला. अर्थातच बाबांवरील श्रद्धेत वृद्धी झाली हे वेगळे सांगणे नको. बाबा एक चमत्कार अनेक! त्यात आमच्या स्वानुभवाची ही एक नवी भर!

इथवर ठीक. परंतु एक इच्छा पूर्ण होताच दुसऱ्या लालसेने ईश्वराला संकटात टाकणे हे भक्ताला नवे नाही. त्याप्रमाणे आईने हेमाच्या विवाहाचे कामही भक्तिभावे बाबांवरच सोपविले. तसे आमच्या कुटुंबावर कुलस्वामिनी श्रीएकवीरा मातेचे साक्षात् कृपाछत्र आहेच. परंतु ही बाबांच्या नवसाची पोर न!

लग्नाचे वय पण प्रापंचिक अडचणी व सुयोग्य वर दृष्टीपथात नसल्याने वडील चिंतित असत. कसे कुणास ठाऊक परंतु एक दिवस अचानक आमचे मेहुणे एका स्थळाची माहिती घेऊन पाहुण्यांसह प्राथमिक बोलणी करण्यासाठी आले. त्या विषयाला खूपच चालना मिळाली. परस्परांची पसंतीही झाली. परंतु निर्णयात्मक स्वरूपाचे उत्तर येईना. बरेच दिवस गेले. कुठेतरी खोळंबा झाला. दारी आलेले स्थळ हातचे जाते की काय! अशी शंका अस्वस्थ करू लागली. पुन्हा बाबांच्या प्रचितीची वेळ आली. त्यांनीच ती जाणीव करून दिली असेच म्हणा ना! 'हमारी बेटी और हमसे मिले बगैर ब्याह!' हे मूक बोल सर्वांनी ताडले. त्वरित गुरुवारी वडील तिला घेऊन शिर्डीक्षेत्री दर्शनास गेले. त्या ठिकाणी दोन वेळा बहिणीला प्रसादात पेढेच मिळाले. अर्थातच तिला सुखद गुदगुल्या झाल्या. ते शिर्डीहून परतले तो दुसऱ्याच दिवशी तिकडील पत्र आले. श्रीफळ व साखरपुड्यासाठी आपण सर्वांनी यावे म्हणजे मुलगी इकडे सर्वांचे पाहाण्यात येईल. या तत्काळ प्रचितीने आम्हा सर्वांना गोड धक्काच दिला. हा... हा... म्हणता सर्व अडचणी दूर झाल्या. मदतीचा ओघ अन् बाबांच्या आशीर्वादाने कार्य पूर्ती 'कुंकूमतिलके शुभमंगल!' घडले. त्यांच्याच (पेढे रुपी) कृपाप्रसादाने आज पहिल्या पुत्रलाभाने तिचा वंशवेल बहरला आहे!

★

# सत्पुरुषाविषयींचा आदर

—श्री. एन. जी. परुळेकर
' केदार, ' प्लॉट नं. १७३
अभिनवनगर, बोरीवली ( पूर्व )

● दक्षिण भारतात होऊन गेलेले एक महान संत. मेहेर बाबा हे त्यांचे नाव. मेहेरबाबांनी एकदा मस्त म्हणजे उन्मनी अवस्थेतील लोकांना हुडकून काढण्यासाठी देशभर दौरा काढला होता. फिरता फिरता दक्षिणेतील ते एका तालुक्याच्या गावी आले. तेथे एका रस्त्यावर झाडाखाली एक वेडा बसलेला त्यांच्याबरोबरीच्या शिष्य मंडळींना दिसला. त्यांनी त्या वेड्याला, बाबा आपल्या मुक्कामावर होते, तेथे नेण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण वेडा आपल्या जागेवरून हलायलाही तयार नव्हता. कुणीही त्याच्याजवळ गेले की शिवीगाळ करून तो मारायला उठे.

शिष्यांनी ही हकीकत बाबांना येऊन सांगितली असता बाबा म्हणाले, " तर मग तुम्ही तो वेडा बसला आहे तेथे बाजूला घर असेल त्यात त्याला कसेही करून बोलावून घ्या. तेथे मी त्याच्याशी एकांतात बोलेन. तुम्ही पुढे व्हा, मी आलोच. "

बाबांच्या आज्ञेप्रमाणे ते शिष्य वेडा बसला होता तेथे आले. बाजूलाच एका बँकेची एक लहानशी शाखा होती. भर कामाची वेळ असल्याने आतील कर्मचारी आपापल्या कामात दंग होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शिष्यांनी बोलावलाच तो वेडा बँकेच्या ऑफिसात यायला निघाला. तेव्हा बाबांचे शिष्य आत जाऊन मॅनेजरला अत्यंत नम्रतेने व विनवणीच्या भाषेत म्हणाले, " महाराज समोरून येत असलेल्या वेड्याशी थोडा वेळ बोलण्याची आमच्या बाबांची इच्छा आहे. तो वेडा आपल्या जागेवरून हलायलाही तयार नव्हता. पण आता तो आपली त्या समोरच्या झाडाखालची जागा सोडून इकडे येत आहे. बाबांच्या आज्ञेचीच ही किमया आहे. तेव्हा आपण जर बाबांना थोड्या वेळापुरते येथे बसू दिलेत तर आमच्यावर उपकार होतील. शिष्यांचे हे बोलणे ऐकून मॅनेजर लगेच म्हणाला, " त्यात काय कठीण आहे ? या निमित्ताने तरी बाबांचे पाय आमच्या बँकेला लागतील. तुम्ही आणा त्या वेड्याला आत. बाबांना हवा तेवढा वेळ येथे बसू द्या. " त्यावर ते शिष्य भीत भीत म्हणाले, " पण साहेब, बाबांना त्या वेड्याशी एकांतात बोलायचे आहे, " क्षणाचाही विलंब न लावता मॅनेजर म्हणाला, " त्यात काय झालं ? आम्ही सारे बाहेर जातो. " असे म्हणून मॅनेजरने इशारा करताच आतील सारी मंडळी, आपल्यापुढील कागद पत्र सारे तसेच टाकून तत्क्षणी ऑफीसबाहेर पडली. कॅशर मोजित असलेल्या

नोटांची पुडकीही तिजोरीत ठेवण्यासाठी थांबला नाही, तशीच ती टेबलावर पडून होती. त्या वेडयाला आत आणण्यात आले. बाबाही तेवढ्यात आलेच.

पुढे त्या वेडयाचे काय झाले ? तो कोण होता ? बाबा त्याच्याशी काय बोलले ? वगैरे गोष्टी येथे गौण आहेत. आपल्या दृष्टीने महत्वाची गोष्ट म्हणजे एका सत्पुरुषाचे नाव ऐकताच त्याच्या सोयीसाठी आपले सारे ऑफिस कागदपत्र आणि नोटांच्या बंडलांसकट सोडून जायचे असा प्रकार फक्त भारतातच घडू शकतो. त्याचे कारण भारतातील सर्वसामान्य माणसानांही असलेला सत्पुरुषांबद्दलचा विलक्षण आदर हेच होय. पण ही गोष्ट सुमारे पन्नास वर्षांपूर्वीची आहे. आध्यात्मिक परंपरेत वाढलेले सामान्य भारतीय लोक पाश्चात्यांप्रमाणे भोगवृत्तीच्या आहारी गेले नव्हते. पण अलीकडे पाश्चात्य भौतिक प्रगतीच्या झगमगाटाने दिपून जाऊन आम्ही भारतीय-सुद्धा भोगवृत्तीच्या आहारी जात चाललो आहोत त्यामुळे यानंतर वरील विलक्षण गोष्टी भारतात पहावयाला मिळतील किंवा काय याची शंका वाटते. ★

---

# श्रीसाईलीला

## श्रीसाईकाव्य बहार विशेषांक

### मराठी साहित्यसृष्टीतील नाविन्यपूर्ण कल्पना

श्रीसाईलीला हे आध्यात्मिक मासिक गेली ५६ वर्षे चालू आहे. या मासिकाचा यंदाच्या मार्च १९७८ चा अंक "**श्रीसाईकाव्य बहार विशेषांक**" म्हणून प्रकाशित होत आहे. या खास अंकात महाराष्ट्रातील अनेक साईभक्तांनी श्रीसाईबाबांच्यावर रचलेल्या अनेक सुमधुर व भावपूर्ण कविता प्रसिद्ध केल्या जातील. मराठी मासिक पत्रसृष्टीत हा पहिलाच्च आगळा यत्न आम्ही केलेला आहे तेव्हा हा असा अंक समस्त साईभक्तांना संग्राह्य वाटेल यात शंकाच नाही. गतवर्षी तर या अभूतपूर्व अंकाचे साईप्रेमींनी स्वागतच केले होते. हा संपूर्ण अंक कवितांनीच गच्च भरलेला असेल. त्यात गद्य मजकुरास अजिबात प्राधान्य दिले जाणार नाही. शिर्डीच्या श्रीसाईलीला लेखक-कवी चतुर्थ संमेलनात या आगळ्या अंकाचे प्रकाशन करण्यात येईल.

**या अंकाची संपूर्ण तयारी व काव्यांची निवड झालेली असल्याने कुणीही कविता-पदे संपादकांकडे पाठवू नयेत.**

# जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

– कु. उज्ज्वला नाईक, डोंबिवली

* दिनांक २ जुलै, वार शनिवार! शनिवार असल्यामुळे साहजिकच माझ्या बहिणीची शाळा लौकर होती. माझी बहीण कु. विद्या ही भांडूपच्या अहिल्या-विद्यालयात शिक्षिकेची नोकरी करते. त्यामुळे शनिवारी ९-३५ च्या गाडीने ती डोंबिवलीहून निघाली. गाडी फास्ट असल्यामुळे व भांडूपला थांबणार नसल्या-कारणाने तिला या गाडीने जाऊन ठाण्याला उतरणे भाग होते, व ठाण्याहून दुसऱ्या ट्रेनने ती भांडूपला जाणार होती. परंतु गाडीमध्ये गर्दी इतकी की बोलायची सोयच नाही! नीट सावधगिरीने उभे राहण्याचीदेखील पंचाईत! तरीसुद्धा डोंबिवली स्टेशनला ती कशीबशी गाडीत चढली. चढता चढताच पायातील दोन्हीही चपला गाडीत आतमध्ये गेल्या त्यामुळे ती अगदी घाबरून गेली होती. परंतु ठाणा येईपर्यंत श्रीसाईकृपेने तिच्या दोन्हीही चपला तिला परत मिळाल्या. परंतु दुसरीच गोष्ट म्हणजे अफाट गर्दीमुळे ठाण्याला उतरणे तिला मुश्कील झाले व ठाण्याला उतरावयास जाता क्षणीच गाडी सुटली. त्यामुळे ती एकदम घाटकोपरला गेली. आता दुसरे मोठे संकट म्हणजे तिचा पासतर फक्त कांजुरपर्यंतचाच व घाटकोपर स्टेशनला एका-एका प्लॅटफॉर्मवर दोन-दोन, तीन-तीन टी. सी.! त्यामुळे आपल्याला तिकिटा-संबंधी विचारतील या भीतीने ती पुलावरून न जाता रूळातूनच दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जात होती. तोंडाने मात्र साईनाथाचा जप चालला होता. कोणत्या बाजूने गाडी वगैरे येईल याकडे तिचे मुळीच लक्ष नव्हते. आणि तिच्या मागून अतिशय वेगाने डेक्कन येत होती! आणि दुसऱ्या बाजूच्या रूळावरून लोकल येत होती. अशा परिस्थितीत बहिणीचा शेवट निश्चित होता...परंतु प्रत्यक्ष साईनाथ बरोबरच असताना कशाची भिती? मग मृत्यूच काय किंवा इतरही काय. कोणाचीही छाया माणसांवर पडू शकणार कशी? मग "मौत भी आ गयी हो तो, टल जायगी"! असे म्हणण्या-सारखेच आहे. माझी बहीण अशा प्रकारे रूळांतून आपल्याच तंद्रीत चालली असताना कोणी एक माणूस आला व त्याने बहिणीला गाडी येत असल्याची सूचना देऊन रूळांच्यामध्ये असणाऱ्या खांबाला घट्ट धरून राहण्याची आज्ञा केली! त्याचप्रमाणे बहिणीने केले. तिची परिस्थिती त्यावेळी गंभीर होती. एका बाजूने डेक्कन व दुसऱ्या बाजूने लोकल तिला आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत होत्या. परंतु ती मात्र खांबाला धरून निश्चल उभी होती. थोड्या अवधीतच सारे काही घडले. गाड्या आल्या तशाच निघून गेल्या होत्या! मृत्यूने निमूटपणे माघार घेतली होती; कारण साईनाथांपुढे त्याने हार खाल्ली होती. आणि नंतर बहीण

घाटकोपरहून कल्याणकडे जाणाऱ्या गाडीने, भांडुपला उतरली व शाळेत सुखरूप पोहोचली होती.

हा प्रसंग आठवला की, अजूनही छातीत धस्स् होते! परंतु दुसऱ्याच क्षणी आठवण होते ती साईनाथांची. त्या क्षणी जर तो माणूस तेथे आला नसता तर मग काय घडले असते याची कल्पनासुद्धा नको! परंतु तो माणूस कसला. ते तर प्रत्यक्ष आमचे परमपूज्य वंदनीय साईमहाराजच होते. फक्त रूप तेवढे वेगळे होते आणि म्हणूनच साईमहाराज म्हणतात "माझा जो जाहला काया वाचा मनी! तयाचा मी ऋणी सर्व काळ! किंवा हे सांगण्याचे तरी प्रयोजन काय? जळी स्थळी काष्ठी पाताळी तेच तर भरून राहिले आहेत व आर्त मानवाची सेवा करीत आहेत... अशा साईनाथांना माझे व माझ्या बहिणीचे कोट्यान् कोटी नमस्कार! ★

## भारतीय अध्यात्माची अनुभूति घेतलेला एक परदेशी माणूस

# भगवत्प्राप्ती – भाई लॉरेन्सचे

## विचार व अनुभव

–श्री. वि. अ. कुलकर्णी
११८२/२६, ई, शिवसदन टाकाळा, कोल्हापूर

● भगवंत भक्त भाई लॉरेन्स यांचा जन्म इ. स. १६१० मध्ये झाला. त्यांचा परिवार अतिशय निर्धन अवस्थेमध्ये फ्रान्स येथील 'लॉरेन' या गावी रहात होता. त्यांचे नाव निकोलस हरमन असे होते. परमेश्वराविषयी त्यांच्या मनात अतिशय श्रद्धा होती. परमेश्वरावर असीम भक्ती केल्यामुळे त्यांच्या जीवनात उत्तरोत्तर प्रगति होऊ लागली. शेवटी ते परमेश्वराचे परम संत बनले आणि ते भाई लॉरेन्स या नावाने प्रसिद्ध झाले.

प्रथम हे सामान्य शिपाई होते. श्रीयुत फोबर्ट यांच्या घरी ते वॉचमन होते. नंतरची पंधरा वर्षे त्यांनी आचाऱ्याची कामे केली. अठरा वर्षाचे असतानाच त्यांच्यावर भगवंतकृपा झाली. तेव्हापासून त्यांचे जीवन एकमात्र भगवंत प्रेमाच्या समाधीमध्येच व्यतित झाले.

भाई लॉरेन्स म्हणतात, " अठराव्या वर्षी माझ्यावर भगवंताची अनोखी कृपा झाली. त्यामुळे माझी जीवनदिशाच बदलली, आणि मी भगवंताचा दास बनलो.

शिशिर ऋतुमध्ये मी एक वृक्ष पर्णहीन अवस्थेमध्ये पाहिला. त्याला पाहताच माझ्या मनात विचार आला. " हा पर्णहिन वृक्ष थोड्याच दिवसात फुलापानानी

बहरून जाईल. किती अगाध लीला आहे भगवंताची ! असा विचार मनात येतो न येतो तोच माझ्या मनात भगवंतकृपेची ज्योत प्रज्वलित झाली. या ज्योतीचा प्रकाश इतका प्रखर होता की चाळीस वर्षानंतरसुद्धा या ज्योतीच्या किरणदेखील मंद झाला नाही."

जेव्हा मी कधीतरी कर्तव्यच्युत होतो तेव्हा कोणत्याहि आपत्तिविना मी भगवंताच्या पुढे शरणांगत होऊन उभा राहतो आणि आर्ततेने विचारतो, " भगवंता, जर अशाप्रकारे मला माझ्या बालबुद्धीवर एकट्याला सोडलास तर माझ्या हातून अपराधाशिवाय काय घडणार ? हे शरणांगत वत्सल, आपणच मला अधोगतीतून वाचवा, आणि माझ्या अपराधांचे परिमार्जन करा. या आर्ततेने केलेल्या प्रार्थनेनंतर मी अपूर्व शांतीचा अनुभव घेतो."

पंधरा वर्षे आचारी बनून नंतर मी जे काम केले त्या कामाने मला खूप संतोष, समाधान लाभत असे. मला कोणतेही काम भगवंताचा प्रसाद वाटत असे.

आमचा भगवंतावर विश्वास, भगवंताच्या पूजेची सर्वोत्तम सामुग्री आहे, यामुळे आमच्यावर कृपेची बरसात होते.

मी साऱ्या प्रसंगामध्ये भगवंताची सहायता घेत असे. भगवंत मला येवून सहाय्य करू लागले त्यामुळे कोणतेही काम करताना मला सावधानता बाळगण्याचे कारण लागले नाही.

आपल्या कमजोरीना किंवा कमीपणाला घाबरून निरुत्साही न बनता, भगवंताच्या गुणांवर विश्वास ठेवून, श्रद्धेने व भक्तीने जर भगवंताची प्रार्थना केली तर ईश्वर कधीच कृपेपासून वंचित होत नाही, याचा मी पूर्णपणे अनुभव घेतला आहे. मला असफलता तेव्हाच मिळाली जेव्हा माझे मन भगवंतकृपेपासून विचलित झाले.

पूर्णतेच्या जवळ जाण्याचा मनुष्य जितका प्रयत्न करील तितकाच तो भगवंतकृपेस अधिकाधिक पात्र होईल.

भगवंताचा अनुग्रह केल्याशिवाय आपले कोणतेच काम सफल होत नाही. भगवंत अप्रसन्न होवू नये म्हणून आपण पवित्र कार्य करीत राहिले पाहिजे. भगवंताच्या कृपेने आमच्या मनातील भगवंताविषयीची भीति नष्ट होते, आणि भगवंताकडे आपण निःसंकोचपणे सफलतेविषयी प्रार्थना करू शकतो.

भगवंत तर आम्हाला अनेक सुखसमृद्धीनी सफल करण्याचा प्रयत्न करीत असतो परंतु आपण मात्र निकृष्ट भावनेने भगवंताकडे विषयभावनेची मागणी करतो. जर आपण उच्च प्रतीच्या भावनेने भगवंताकडे मागणी केली तर भगवंताच्या कृपेचा ओघ आपल्याकडे इतक्या वेगाने येतो की जणु काही इतके दिवस तो अडून राहिला होता, आणि आता मार्ग खुला झाल्यावर तो प्रवाहित झाला आहे.

भगवंतकृपेचा ओघ बंद होण्यास कारणीभूत आपणच असतो. आपण आपल्या अपराधाबद्दल याकरिता काहीच शिक्षा घेऊ शकत नाही. म्हणून मागील सारे

विसरून पुढील चुका न होण्यासाठी व अपराधी न बनण्यासाठी जागरूक राहिले पाहिजे. भगवंतकृपेच्या मार्गामध्ये अडथळे करणाऱ्या साऱ्या गोष्टी शोधून त्यांचा समूळ नाश केला पाहिजे. भगवंतकृपेस पात्र होण्यासाठी आपण आपले हृदय शुद्ध केले पाहिजे.

ज्या भगवंताने कृपावंत होवून आपल्या दुःखाचा नाश केला आहे, त्या भगवंताला आपण आपल्या अगदी निकट अनुभव करतो. रोग किंवा क्लेशकारक यातना मनुष्य रडून रडून भोगतो, परंतु क्लेश आपल्या अंतःकरणाच्या शुद्धीसाठी प्रभुलीलेचा प्रकार मानतात त्या लोकांना क्लेश अत्यंत सुखकारक वाटतात. आपले अंतःकरण क्लेश भोगून शुद्ध झाल्यानंतर प्रभूच्या मायेचा आपल्याला उत्कट व आनंदमयी अनुभव येतो.

स्वतः माझ्यावर किती तरी वेळा क्लेशकारक प्रसंग आले आहेत. परंतु मला ते क्लेश वाटले नाहीत. यावेळी प्रभूकडे मी काही मागितले नाही. परंतु इतकीच प्रार्थना केली की, " हे प्रभू, मला माझे क्लेश धीर गंभीरपणे भोगण्याची शक्ती दे. " खरोखरच ते क्षण किती आनंददायी होते, ज्यावेळी क्लेश भोगतानासुद्धा आम्हाला आमचा परमात्मा आमची सोबत करीत असतो ही भावना जाणून येते. म्हणूनच कितीही मोठे दुःख असले तरी आपण ते हसतमुखाने भोगले पाहिजे.

सर्वशक्तिमान सर्वव्यापक भगवंतांच्या असीम महिमेला जो कोणी जाणतो तो संसारातील सुखदुःखाचे डोंगर सहजतेने पार करतो. कारण असीम भगवंतभक्तीमुळे भगवंताच्या कृपेशिवाय त्याला दुसरे काही दिसतच नाही. आपल्या मनातील विषय भावना समूळ नष्ट करून भगवंताच्या पायाशी लीन होऊन मनातील दुःखे बोलली असता भगवंत नक्कीच कृपावंत होऊन संसारात सुखी करतो. ही भगवंतकृपेची अगाध लीला होय. ★

# साईंनी दिलेले कुत्र्यास जीवदान

—सौ. विमल केरुसिंग परदेशी
१११ प्रतापगंज पेठ, सातारा

● आमच्या घरात काही कारणास्तव मुलांची भांडणे झाली व त्यामुळे माझ्या पतींनी मुलांना मारहाण केली व तो प्रकार चालू असताना माझी नणंद वय ४५ वर्षे मुलांना सोडविण्याकरिता मध्ये आली त्यावेळेस आम्ही पाळलेले एकच महिन्याचे गोजीरवाणे गोंडस कुत्र्याचे पिलू नणंदेच्या पायात आले त्यामुळे त्या बिचकून

ओरडल्या म्हणून माझे पती श्री. केरुसिंग जास्तच चिडले व त्यांनी त्या रागाच्या भरात त्या कुत्र्याचे पिलास उचलून साधारण ७ ते ८ फूट लांब काँक्रीटच्या भिंतीवर टाकले. त्यानंतर सर्व प्रकार शांत झाला. पिलाकडे कोणाचेच लक्ष नव्हते. दुसऱ्या दिवशी मी पाहिले तर पिलाचे हातपाय लुळे पडलेले. तोंडातून फेस येत होता. ते पाहून माझ्या अंतःकरणास अत्यंत हळहळ लागली व मन अत्यंत चिन्तातूर झाले, त्यामुळे मी भयग्रस्त झाले. कामच सुचेना. इतक्यात मला बाबांच्या उदीची आठवण झाली.

मी लगेच उदी काढली. त्या पिलास मांडीवर घेतले व श्रीसाईंचा धावा केला की या पिलाचे काही बरे वाईट झाले तर माझ्या पतीस हत्येचे पातक लागेल करिता त्यास जीवदान द्या व कृपा करा असे म्हणून त्या पिलाचे तोंडात उदी घातली. त्याच्या अंगास लावली व चमत्कार असा की दहाच मिनिटात त्या पिलाने डोळे उघडले व हळुहळू ते खेळू लागले. बाबांनी माझी करुण हाक ऐकून त्यास जीवदान दिले.

श्रीसाई प्रत्येक प्राणीमात्रावर किती दया करतात. त्यांच्या नजरेत सर्वांकरिता किती प्रेम जिव्हाळा व तळमळ आहे. खरोखरीच धन्य आहे साई माऊलीची ! ★

---

## भगवान श्रीसाईबाबांच्या छायाचित्रांच्या व प्रकाशित श्रीसाईसाहित्याच्या प्रदर्शनाचे अपूर्व स्वागत

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथी निमित्ताने शिरडी येथे नोव्हेंबर महिन्यात एक छोटेखानी पण भव्य असे प्रदर्शन भरविण्यात आले होते. या प्रदर्शनात श्रीसाईबाबांची आतापर्यंत उपलब्ध असलेली सर्व प्रकारची लहानमोठी व रंगीत छायाचित्रे तसेच आतापर्यंत प्रकाशित झालेली लहानमोठी सर्व भाषेतील श्रीसाईबाबांच्या वरील पुस्तके, ग्रंथ व विविधभाषेतील नियतकालिके यांचा प्रामुख्याने समावेश होता. शिर्डीच्या हेमाडपंत वाचनालयात प्रदर्शनाचे उद्घाटन श्रीसाईबाबांना प्रत्यक्ष अनेकदा पाहिलेले व अगदी लहानपणी त्यांचा सहवास लाभलेले अहमदनगरचे श्रीसाईभक्त श्री. अनंत जयदेव चितांबर यांचे शुभहस्ते शुक्रवार दिनांक १८ नोव्हेंबर १९७७ रोजी सकाळी १० वा. झाले. मंगळवार दिनांक २२ नोव्हेंबरपर्यंत हे प्रदर्शन खुले ठेवण्यात आले होते. असंख्य साईभक्तांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतला. कोर्टरिसिव्हर श्री. पाठक साहेब यांनी हे प्रदर्शन पाहून समाधान व्यक्त केले.

# शिरडी-वृत्त माहे ऑक्टोबर सन १९७७

## दसरा-उत्सव

या महिन्यात साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव आल्यामुळे बाहेरगावचे साईभक्तांची गर्दी बरीच होती. उत्सव मोठ्या थाटात साजरा झाला.

**दसरा उत्सव १ ला दिवस :–** गुरुवार दि. २०–१०–७७ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती सुरू झाली. गुरुवारचा महत्वाचा दिवस व उत्सव त्यामुळे मोठ्या संख्येने साईभक्त आरतीला उपस्थित होते. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधिमंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. समाधिमंदिरात सकाळी ६–३० वाजता श्रींचे मंगलस्नान झाल्यावर नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ वा. पर्यंत ह. भ. प. डॉ. प्रा. नारायणराव राजदेरकर एम. ए. पी. एचडी. औरंगाबाद यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारती झाल्यावर ७–३० ते ९ वाजेपर्यंत व ९–३० ते ११ पर्यंत श्री. जितेन्द्र अभिषेकी यांचे शिष्य श्री. राजा काळे व श्री. अरुण आपटे यांचे गायन झाले. त्यानंतर कु. शोभा जोशी मुंबई यांचे गायन झाले. रात्री ९–१५ ते ११–४५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक वाद्यांच्या गजरात गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**दसरा उत्सव २ रा दिवस :–** शुक्रवार दि. २१–१०–७७ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती झाली. नंतर श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून समाधि मंदिरात आली. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त सकाळी ९ वा. भिक्षा झोळी कार्यक्रम झाला. मा. श्री. का. सी. पाठक साहेब यांनी स्वतः झोळी घेऊन साईभक्तांना झोळ्या दिल्या. शिरडी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा, आरती करून भिक्षा झोळीत गहू, तांदूळ, नारळ, ज्वारी, बाजरी, फळे, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १०–३० ते १२ पर्यंत श्रींचे पुण्यतिथी कीर्तन डॉ. राजदेरकर यांनी केले. त्यानंतर माध्यान्ह आरती, तीर्थ-प्रसाद वाटण्यात आला. दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत श्रींचा आराधना विधी कार्यक्रम मा. श्री. का. सी. पाठक साहेब यांचे हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी ब्राह्मणांना धोतर, उपरणे व सुवासिनींना खण दिले. संस्थान सेवेकऱ्यांना वस्त्रदान केले. सायंकाळी ५ वा. सीमोल्लंघन मिरवणूक वाजतगाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्याठिकाणी श्रींच्या निशाणाचे व शमीचे पूजन, धार्मिक पूजाविधी कार्यक्रम मा. रिसीव्हर साहेब यांचे शुभहस्ते झाले. व सर्वांनी खंडोबा देवाचे दर्शन घेतले.

मिरवणूक परत येतेवेळी साई भक्तांनी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

सायंकाळी धूपारती झाल्यावर ७-३० ते ८-३० पर्यंत मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण ब्रॅण्ड पथक भोईवाडा परेल यांच्या बँड वादनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर रात्रौ ९ ते ९-१५ पर्यंत संस्थान कर्मचाऱ्यांचे लेजीम झाले. ९-१५ ते १ वाजेपर्यंत श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गावातून निघाली. मिरवणुकीला श्रीकृष्ण बॅण्ड पथक अग्रभागी होते. सनई, चौघडा, डफ, सिंगवादन साईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्ड पथक शिर्डी, राहाता बॅण्ड पथक, भजन, वादन गायन कार्यक्रम झाले. पुण्याचे नकलाकार श्री रघुनाथ बाबूराव सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून करमणुकीचे कार्यक्रम केले. त्याचप्रमाणे स्थानिक लोकांनी भारुड गारुड कार्यक्रम केले. मिरवणूक १ वा. मंदिरात आल्यावर भक्तमंडळींनी कलाकारांच्या गायनाचे कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**दसरा उत्सव ३ रा दिवस** :- शनिवार दि. २२-१०-७७ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान ठिकाणी सकाळी ७-३० ते ८-३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत डॉ. नारायणराव राजदेरकर यांचे कीर्तन झाले. धूपारती झाल्यावर रात्री ७-३० ते १० वाजेपर्यंत सौ. अलका जोगळेकर मुंबई यांचे गायन झाले व त्यानंतर शेजारती झाली.

**दसरा उत्सव ४ था दिवस** :- रविवार दि. २३-१०-७७ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५-१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी १०-३० ते दुपारी १२ वाजेपर्यंत संस्थान गवई काव्यतीर्थ श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांचे कालाकीर्तन झाल्यावर दही हंडी कार्यक्रम होऊन माध्यान्ह आरती झाली व तीर्थप्रसाद वाटणेत आला. रात्री ७-३० ते १० वाजेपर्यंत सिने पार्श्वगायक श्री. जयवंत कुलकर्णी व पार्टीचे कार्यक्रम झाले. नंतर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा** :- रात्री १० ते १२ श्रींची पूजा व चंद्रपूजा मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांचे हस्ते झाली. उपस्थित साईभक्तमंडळींना दूध, पोहे तीर्थ-प्रसाद वाटणेत आला. डॉ. के. बी गव्हाणकर यांचे प्रवचन झाले. नंतर त्यांच्या सहकाऱ्यांनी भजन, गायन, वादन व करमणुकीचे कार्यक्रम करून रात्रभर जागर केला.

**माननीयांच्या भेटी** :—

१) मा. श्री. चंद्रशेखर, अध्यक्ष जनता पार्टी, न्यू दिल्ली

२) मा. श्री. मढीया, डायरेक्टर जनरल ऑफ रोड केंद्र सरकार

३) मा. श्री. शहा, अतिरिक्त सत्रन्यायाधीश अहमदनगर

४) मा. श्री. व्ही. एस. कौलजगी, राज्यमंत्री आरोग्य व कुटुंबसुधारखाते कर्नाटक कर्नाटक.

५) मा. श्री. निंबाळकर, IAS शुगर डायरेक्टर महाराष्ट्र.

६) मा. श्री. राजाराम बापू पाटील, जनता पार्टी महाराष्ट्र.

७) मा. श्री. प्रधान, जनता पार्टी महाराष्ट्र.

८) मा. श्री. के. जगन्नाथ शेट्टी, न्यायाधीश उच्चन्यायालय कर्नाटक.

९) मा. श्री. रा. ज. देवतळे, वनमंत्री महाराष्ट्र.

१०) मा. श्री. एकनाथराव निंबाळकर, राज्यमंत्री, मध्यम व मोठे पाटबंधारे (महाराष्ट्र)

११) मा. श्री. जितकर, जिल्हाधिकारी अहमदनगर.

१२) मा. श्री. दादासाहेब रुपवते, समाज कल्याण मंत्री महाराष्ट्र.

१३) मा. श्री. आर. सी. सक्सेना IAS. जिल्हाधिकारी होशंगाबाद. (म. प्र.)

हवापाणी :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

**काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली त्यांची नावे :–**

**कीर्तनः** १) संस्थान गवई, श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे एकादशी व महत्वाचे दिवशी झाली. २) ह. भ. प. छबु महाराज मुल्हेरकर. जि. नासिक यांचे कीर्तन. ३) ह. भ. प. नारायणराव राजदेरकर औरंगाबाद यांचे कीर्तन.

**प्रवचनः** १) ह. भ. प. मुरलीधर रा. देशमुख, अ. नगर. २) ह. भ. प. हिराबाई देशमुख आळंदी. ३) डॉ. के. भ. गव्हाणकर. ४) ह. भ. प. कुमार सिद्धार्थस्वामी. श्रीरामपूर.

**गायन, वादन :** १) श्री. श्रीराम व्ही. सालडेकर, मुं. २) श्री. राजा प्र. काळे मुं.

**नृत्य, नकला :** ३) श्री. मधुसुदन भावे, औरंगाबाद. ४) श्री. मंगेश मुळे, मुंबई. ५) श्री. अरुण आपटे पुणे. ६) श्री. संजय प्र. ठोमरे ठाणे. ७) श्री. राजेन्द्र सहानी औरंगाबाद. ८) श्रीकृष्ण बॅण्ड पथक भोईवाडा मुंबई. ९) श्री. हडकर अंधेरी मुंबई १०) श्री. अनंतराव राणे मुंबई ११) श्री. सदाशिवराव जाधव पुणे १२) श्री. चिंतामणराव नवरे मुंबई. १३) श्री. दिगंबरराव भातोडे राहाता १४) सौ. लीला प्रभू मुंबई १५) श्री. भोलानाथ समेळ मुंबई. १६) श्री. नन्हे बाळू कुंवर बिदर १७) श्री. रघुराम मद्रास १८) श्री. बाळ पेडणेकर मुंबई १९) श्री. पुरुषोत्तम वि. बावकर मुंबई २०) डॉ. एम. के. कीर्तिकर मुंबई २१) श्री. रघुनाथराव बा. सांडभोर पुणे. २२) सौ. शरयु सा. मराठे, शिरडी. २४) सौ. मंगला प्र. पाठक औंढानागनाथ. २५) श्री. संजीव राणे, मुंबई २६) श्री. चंपतराव मुळे, औरंगाबाद २७) श्री. शामसुंदर भेडा संगमनेर, २८) श्री. ज्ञानेश्वर रा. वैद्य शिरडी.

२९) श्री. शिवराम बा. बिडवे, बेळगाव ३०) श्री. रामानंदस्वामी, बेळगाव ३१) श्री. देवीदास रा. अम्रेबुवा. औरंगाबाद ३२) श्री. जयवंत कुलकर्णी व पार्टी मुंबई ३३) श्री. नारायणराव क्षिरसागर चिकल ठाणे. ३४) श्री. राघूजी भा. सालकर, कोपरगाव. ३५) श्री. राजेश्वर शं. देशमुख उमरावती. ३६) सौ. सविता सु. गिजरे शिरडी. ३७) श्री. विठ्ठलराव मांजरेकर शिरडी. ३८) श्री. जगन्नाथ गणाचार्य मुंबई ३९) श्री. शेखनबाव ड. पटेल, आसलगाव ४०) श्री. रत्नाकर ना. कोराटे, शिरडी. ४१) श्री. मुकेश मुळे श्रीरामपूर. ४२) श्री. हरकचंद्र च. रुपनाळ पुणे, ४३) श्री. सखाराम रा. सालकर, कोपरगांव ४४) श्री. बालमभाई बॅण्डवाले राहाता ४५) श्री. अशोक ना. कोराटे शिर्डी. ४६) श्री. माधव भां. शेळके शिरडी. ४७) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर शिरडी ४८) श्री. बाळा पिलाजी गुरव शिरडी. ४९) श्री. शामराव मिराणे शिरडी. ५०) श्री. रघुनाराव नागरे शिरडी. ५१) सौ. अलका जोगळेकर मुंबई. ५२) श्री. राणे मुंबई ५३) श्री. नवरे मुंबई. ५४) श्री. विजयबाला, नागपूर ५५) श्री. शर्मा नागपूर. ५६) श्री. धोंड मुंबई ५७) श्री. विनायक लाड मुंबई ५८) शाहीर सुखदेव कांबळी मुंबई ५९) शाहीर मसुरकर मुंबई ६०) श्री. दिलीप मोरे मुंबई ६१) श्री. एकनाथ धनवडे मुंबई. ६२) श्री. अनंत पांचाळ, मुंबई ६३) श्री. शशिकांत पुसाळकर मुंबई. ६४) श्री. नंदकिशोर कदम मुंबई. ६५) कु. संगिता गव्हाणकर मुंबई. ६६) दत्ता मोरे मुंबई ६७) श्री. रामदास पाटील, मुंबई ६८) श्री. आप्पा सामंत मुंबई ६९) श्री. अशोक सावंत मुंबई ७०) श्री. अनिल देशपांडे मुंबई. ७१) श्री. अशोकराव सावंत कोळीवाडा मुंबई ७२) श्री. रामचंद्र बोभाटे मुंबई. ७३) श्री. चंद्रकांत पांचाळ मुंबई. ७४) श्री. सुधाकर पाटील मुंबई. ७५) श्री. नामदेव केणी, मुंबई ७६) श्री. बबन तावडे मुंबई ७७) श्री. प्रमोद याज्ञीक मुंबई. ७८) श्री. सुरेश रांगणेकर मुंबई ७९) श्री. माणिकराव काळे मुंबई.

## शिरडी–वृत्त माहे नोव्हेंबर सन १९७७

या महिन्यात श्रीसाईबाबांचे समाधि दर्शनाकरिता बाहेरगावची भक्तमंडळी बरीच आली होती. गुरुवार, रविवार व सुट्टीचे दिवशी उत्सवाप्रमाणे अलोट गर्दी होती. काही कलाकारांनी श्रींपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन** :– १) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली. २) ह. भ. प. वसंत वि. शास्त्री तथा आबा पणशीकर, मुंबई.

**प्रवचन** :– १) ह. भ. प. कुमार सिद्धार्थस्वामी श्रीरामपूर

२) ह. भ. प. एस. स्वामी ऋषीकेश

३) ह. भ. प. कपिलेश्वर महाराज आळंदी पुणे

४) लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी

**भजन, गायन** { १) श्री. ओंकार ए. मोरे, मालेगाव २) श्री. रवी गो. गांधी,
**वादन** { मुंबई ३) श्री. गौतम म. गांधी, मुंबई १९
४) श्री. अनुराग कुमार, मुंबई ५) कु. वंदना मो. शिरोडकर, मुंबई ७९ ६) कु. विश्वनाथ मो. शिरोडकर, मुंबई ७) श्री. मोहन वि. शिरोडकर, मुंबई ८) श्री. राजेन पटेल, मुंबई ९) श्री. अनिल वा. पगारे, मुंबई २२ १०) श्री. दत्तोबा ओं. गुरव, शिरडी ११) श्री. के. टी. टिकू, मुंबई १२) श्री. राजेश के. टिकू, मुंबई १३) श्री. दामोदर ब. हिरवे, नासिक १४) श्री. जे. बी. बी. नायडू व भजनपार्टी, विजयवाडा १५) श्री. कृष्णमूर्ति म. भिडे, हुबळी १६) श्री. सदानंद ह. बारभोडे, रत्नागिरी १७) श्रीसाई भजनी मंडळी, गावदेवी मुंबई १८) सौ. शोभना म. जावळे, मुंबई ५७ १९) श्री. भास्करराव अमेंबल, मुंबई २०) श्री. बाळ पळसुले, सांगली २१) श्री. मुबारक बा. माहात, सांगली २२) श्री. विजयकुमार मिश्र, इटारशी २३) गुरुसेवा ब्रास बॅण्ड पार्टी, येवला २४) श्री. एम. राजामणि, मुंबई ३१ २५) रेडिओस्टार व टी. व्ही. स्टार बळीराम दांडूक आणि पार्टी वरळी, कोळीवाडा मुंबई २६) शाहीर तानाजी बलसाने २७) श्री. तुकाराम पाटील २८) श्री. गणपत म. पाटील २९) श्रीमती निर्मलाबाई कोळी ३०) श्रीमती यमुनाबाई दांडूक ३१) श्रीमती चांगुणाबाई धनू, मुंबई.

कार्तिकी महाएकादशी :– कार्तिकी एकादशीनिमित्त श्रींचे समाधिमंदिरात कीर्तन, रात्री श्रींचे पालखीची गावातून मिरवणूक भारुड, गारुड कार्यक्रम झाले.

तुलसीविवाह :– श्रीद्वारकामाईत तुलसीविवाह कार्यक्रम सालाबादप्रमाणे थाटात साजरा झाला.

**सन्माननीयांच्या भेटी :–**

१) मा. सौ. प्रतिभा पाटील, शिक्षणमंत्री महाराष्ट्र राज्य

२) मा. श्री. जगेश देसाई, राज्यमंत्री वित्त, परिवहन व तुरुंग महाराष्ट्र

३) मा. श्री. शिवाजीराव पाटील आर. डी. सी. अ. नगर

४) मा. श्री. जितकरसाहेब, जिल्हाधिकारी अ. नगर

५) मा. श्री. जी. डी. तपासे, राज्यपाल उत्तर प्रदेश

६) मा. श्री. नासिकराव तिरपुडे, आदिवासी विकास, पर्यटन मंत्री महाराष्ट्र

७) मा. श्री. मल्हारराव माहुरकर, राज्यमंत्री, उर्जा, नियोजन विधानकार्य महाराष्ट्र

८) मा. श्री. रामूभाई जाधव, पा. सेक्रेटरी, मुख्यमंत्री कार्यालय, गुजराथराज्य

हवापाणी:– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. ★

## श्रीसाईबाबांच्या जागतिक मंदिरांतील

# * मूर्तींच्या छायाचित्रांचे अपूर्व प्रदर्शन ! *

### मंदिर चालकांना विनंती

श्रीसाईबाबांच्या साठाव्या महानिर्वाण पुण्यतिथीच्या निमित्याने शिरडी येथे येत्या मे महिन्यात एक अपूर्व प्रदर्शन भरविण्यात येत आहे.

श्रीसाईबाबांची भारतात ठिकठिकाणी नव्हे तर जगातही मंदिरे आहेत. या मंदिरातून कुशल शिल्पकारांनी बाबांच्या विविध प्रकारे घडविलेल्या नयनरम्य अशा मूर्ती स्थापन केलेल्या आहेत. अनेक चित्रकारांनी आपल्या कुंचल्यातून बाबांच्या रेखीव सुंदर प्रतिमा चितारलेल्या आहेत. अशा या मूर्तींच्या व चित्रांच्या, छायाचित्रांचे अपूर्व असे प्रदर्शन भरविण्याचे योजिले असून साईभक्तांना हे प्रदर्शन पहाण्याची एक दुर्मिळ संधि लाभणार आहे.

श्रीसाईबाबांच्या जगातील ठिकठिकाणच्या मंदिर चालकांनी आपल्या मंदिरातील बाबांची मूर्तीची किंवा प्रतिमांची छायाचित्रे या प्रदर्शनासाठी पाठवून संपूर्ण प्रकारचे सहकार्य संस्थानला करावयाचे आहे. या प्रदर्शनात भाग घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची फी आकारण्यात आलेली नाही. मंदिर चालकांनी आपापल्या मूर्तीचे किंवा प्रतिमेचे छायाचित्र २५ सेंटीमीटर लांब (१० इंच) व २० सेंटीमीटर रुंद ( ८ इंच ) या मोजमापात शक्यतर पिवळसर किंवा क्रिमरंगाच्या माऊंटवर चांगले चिकटवून पाठवावयाचे आहे. मंदिरात बाबांच्या एकाहून अधिक मूर्ती किंवा प्रतिमा असतील तरी त्यांची याच मोजमापात छायाचित्रे माऊंटवर बसवून पाठवावीत. काचेच्या फ्रेमस् अजिबात पाठवू नयेत. सर्व चित्रांच्या मागे चित्रातील मूर्ती कोणत्या मंदिरातील आहे. ती किती फूट उंचीची, शिल्पकार कोण, चित्रकार कोण, केव्हा स्थापन केली याचा निर्देश असावा.

सर्व छायाचित्रे उशिरात उशिरा **३१ मार्च १९७८** पर्यंत संपादक श्रीसाईलीला, 'साईनिकेतन' ८०४ बी खोदादाद सर्कल, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर, व्यवस्थित पाठवावीत. वैयक्तिक विनंती पत्रे पाठविली जाणार नाहीत तेव्हा हेच विनंतीपत्र समजून सहकार्य द्यावे अशी विनंती आहे.

— संपादक

# श्रीसाई–दर्शन

श्री सती गोदावरी माताजी



श्री सती गोदावरी माताजी

( साकुरीच्या श्रीसती गोदावरी माताजी यांनी रचलेला हा अभंग पहिल्या प्रथम प्रसिद्ध करण्याचे सद्‌भाग्य श्रीसाईलीलेला लाभत आहे. —संपादक )

साईनाथ सद्‌गुरु, विश्वाचा आधारु ।
भक्तिकल्पतरु । भक्तविसावा ॥ ध्रु. ॥

साईनाम तारक, चराचर व्यापक ।
घेतां जाय पातक । जन्माचिया ॥

शिरडीग्राम गोदातीरीं, वाटे अमरपुरी ।
वसे साईदरबारी । सिंहासनिया ॥

होतां साई–दर्शन, भक्त आकर्षण ।
लोहचुंबकासमान । मनाचिया ॥

साईचा फकिरीबाणा, कार्य करी अयोध्याराणा ।
नसे द्वैताद्वैत जाणा । सत्पथाचिया ॥
साईनाम कीर्ति, देशविदेश धरती ।
अस्तन पावे गभस्ति । ब्रह्मांडाचिया ॥
सांई ही भक्तांची आई, बालके येति दुरुनीही ।
सुखदुःखे सांगति पायी । वात्सल्येचिया ॥
साई उपासनी एकरुप, वंदुनी अबला तद्रूप ।
सोडोनिया जगव्याप । स्थिर चरणाचिया ॥

— परमपूज्य श्रीसति गोदावरी माताजी,
साकुरी कन्याकुमारीस्थान,

# श्रीसाईनाथ प्रसन्न

भाव भक्तिची लावूनी ज्योती
ओवाळीते आरती साईबाबा ओवाळीते आरती
भावभरल्या नयनानी देखिले बाबांनी
अनुभविले सुख हे मन्मनानी
भक्तिची ज्योत उजळली तेज पडले संसारी
अखंड तेवत राहो ज्योत मम अंतरी
आशीर्वादाचा हात पाहूनी मनी घेतली सबूरी
दुःख संकटे यातना पळाल्या दूरी
मनी भोळा भाव ठेवूनी धरिले श्रीसमर्थ चरण
स्वार्थ सोडूनी परमार्थी रमवी मम मन
दलीत सेवा करूनी संतोषवू दे तुजला
असाच आशीर्वाद राहो विनवीत सुमन तुजला

— डॉ. सौ. सुमती ल. खानविलकर
नांगरपूना रोड, लोणावळा,

# ऐसे दानी मेरे साई

जो माँगो वो देते-ऐसे दानी मेरे साई
अमिरोंके ये अमिर बैठे पत्थरपे कोई
है बाबाके दुऑसे चलती गाडी भक्तोंकी
लाख बार दर्शन तो फिर ना प्यास बुझे मनकी
बंधू भावसे मिले सभिसे करता जो है भलाई
जो मांगे वो देते — — —
हिरे मोति मांगके कैसी मिलेगी मनकी शांती
जीवन मे कहि भटक न जाए ये हि करे बिनती
कौन मिटा सकता फिर जिसके करम हो सच्चाई
जो मांगे वो देते — — —

– श्री. जयवंत कुलकर्णी
कुलकर्णी कॉटेज, विलेपारले.

# हे साई !

हे साई, तुझीया चरणी आलो । तुझ्या पायाचा दास मी झालो ।
तुझ्या पायाचा दास मी झालो । दास मी झालो ।। ध्रु. ।।
जगी दिसेना कांही मजला । प्रकाश नाही तुझ्यासारखा ।
तूंच त्राता, तूंच दाता, तुझ्या मंदिरी शरण मी आलो ।। १ ।।
तूं कृपाळू माऊली माझी, तूं दयाळू सावली माझी ।
तूं यहाकर्ता, दुःखहर्ता, । तुझ्या चरणी लीन मी झालो ।। २ ।।
महा संकटी रक्षण माझे, तुझ्यावाचुनी कोण पाहिजे ।
तूंच अनंता, परमानंदा, तुझ्या सेवेसी मुक्त मी झालो ।। ३ ।।

– श्री. अशोक केळकर
१२३४, सुभाषनगर, शुक्रवारपेठ, पुणे २

# प्रभो साईनाथाच्या नामस्मरणात

प्रभो साईनाथाच्या नामस्मरणात
अद्भूत किमया
तुझ्याच पावन नामस्मरणाने
दाविली अनोखी दुनिया ।।

प्रभो साईनाथाच्या नामस्मरणात
वेगळाच ठेवा
तुझ्याच पावन नामस्मरणाने
लाभे भक्तांना सद्गुणांचा मेवा ।।

प्रभो साईनाथाच्या नामस्मरणात
महान थोरवी
तुझ्याच पावन नामस्मरणाने
तूच भक्तांना भवपाशातून सोडवी ।।

प्रभो साईनाथाच्या नामस्मरणात
अविट गोडी
तुझ्याच पावन नामस्मरणाने
चाले डौलात माझी संसार होडी ।।

# साईलीलेची कृती

साईनाथाची पाहुनि मूर्ती
येई भाव-भावनांना भरती
तेल विना वाती जळती
भक्त गणांचे जीवन उजळून निघती ।। १ ।।

साईलीलेची अघात कृती
जीवन जगाया मिळे स्फूर्ती
दुराचार, कृष्णकृत्ये दूर पळती
अन् मिळे मोक्ष प्राप्ती ।। २ ।।

—श्री. अरुण कनिराम जोहरी
जोहरीवाडा, तळोदे,
( जि. धुळे )

# श्रीसाईभाव

ज्ञान रत्न सर्व रत्नामध्ये श्रेष्ठ ।
मूल्यवान जेष्ठ ज्ञानमूर्ती ॥ १ ॥
बुद्धी दीपगृह सर्व शक्तीमान ।
आत्म्याशी मिलन योग युक्ती ॥ २ ॥
आदि मध्य अंती परमात्मी नाती ।
दिव्य गुण व्रती पुरुषार्थी ॥ ३ ॥
तीव्र पुरुषार्थी निश्चयी संकल्प ।
संस्कार प्रकल्प साईमूर्ती ॥ ४ ॥
दास म्हणे साई विश्वाचा उद्‌गाता ।
चैतन्याचा भ्राता पूर्ण साई ॥ ५ ॥

— शिरसाट गुरुजी, शिर्डी

# पाय ते धरावें साईनाथाचे

( १ ) ॥ पाय तें धरावे साईनाथाचे ॥
॥ वय झाले फार दृष्टी झाली मंद ॥
॥ शरीर तें थकले, जीवन झाले संथ ॥
॥ पाय तें धरावे साई नाथाचे ॥
( २ ) ॥ दिलासा हा धरा बाबाच्या नामाचा ॥
॥ मुखे साई, साई म्हणा हाची तो मंत्र ॥
॥ योग, तप नको, तंत्र आभास नको ॥
॥ पुराणे नको, नको यात्रा प्रयास ॥
( ३ ) ॥ मन होईल शांत, चित्त होईल स्थीर ॥
॥ चिरंतन तें धरा पाय बाबाचे सनातन ॥
॥ चिरागा नंद सरस्वती सांगे हेंची सत्त ॥
॥ साई वाचोनी साधना नाही ॥

— श्री. प्रभाकर श्रीकृष्ण जठार
जठार बंगला लो. टिळक मार्ग,
दहिसर, मुं. ६८

# आम्ही देवाची लेकरं

आम्ही देवाची लेकरं
साईनाथ आमुच्या पाठी ॥ ध्रु. ॥

दीन दुबळ्यासी पाहता
मन गहिवरूनी येता
साई तूंच त्यांचा त्राता
जन्म त्यांचा तुजसाठी ॥ १ ॥ साई.. ...

साईभजनी लागावं
मन तल्लीन करावं
साईनाथांनी सांगावं
श्रद्धा आणि सबुरीसाठी ॥ २ ॥

बेडकीला जीवदान
कडूनिंबाची गोड पानं
त्यांना साईचे वरदान
फिरे प्रेमळ हात पाठी ॥ ३ ॥

लागता शिरडीस पाय
सर्व टळती अपाय
म्हणुनी तूंच माझी माय
लागे जीवा आंस भेटी ॥ ४ ॥

परमार्थाची ही गोठ
सुखी जीवनाचा माठ
भरोनिया कांठोकाठ
जैसा तुम्ही अगजेठी ॥ ५ ॥

—श्री. शशिकांत तोंडवळकर
डी/२६, मेघवाडी, लालबाग,
डॉ. राव मार्ग, मुं. १२.

# साईनाथ सद्गुरु माझे

साईनाथ सद्गुरु माझे साधुसंत राजे ।
तीर्थक्षेत्री गोदा-तटीं या नित्य ते विराजे ॥ धृ० ॥
दयेचे सागर कृपेचे आगर ।
अवतरले प्रभू दत्तावतार ।
कीरत त्रिभुवनीं गाजें ॥ १ ॥ साईनाथ ॥
आनंदी आनंद शिरडींत नांदे ।
आरती बाबांची गजरीं निनादे ।
जल्लोश भक्तांचा गाजे ॥ २ ॥ साईनाथ ॥
अल्ला मालिक मी तर बंदा ।
अमृतवाणी वदती हसता ।
कुणी न देता कुणी न घेता ।
कोण कुणाचे राजे ॥ ३ ॥ साईनाथ ॥
भाव भक्तिचे सदा भुकेले ।
भक्त-जनाना अंकित केले ।
कौतुक करुनी रूप दावितां ।
कधीं राम कधीं शाम ।
सुंदर मूर्ती विराजे ॥ ४ ॥ साईनाथ ॥

–श्री० प्रभाकर गजानन जोशी
जी. ३. ब्लॉक नं. ८, ३ रा माळा
राजर्षी शाहूनगर, माहीम धारावी,
मुंबई, नं. ४०००१७.

# झाल्या ग तिन्हीसांजा....

झाल्या ग तिन्हीसांजा ।
लाविली सांजवात ।
प्रार्थिले साईनाथा ।
रक्षि तुं प्राणनाथा ॥ १ ॥
भाव भक्तिचा भुकेला
माझा ग साईनाथ ।
धावला तत्क्षणी ग ।
रक्षाया स्वामीनाथ ॥ २ ॥
धरी काळाचा ग हात ।
टळला गाडीचा अपघात ।
मनी हादरलेले भक्त ।
म्हणती जय जय साईनाथ ॥ ३ ॥
साई माझा बंधु तात ।
देई वेळोवेळी हात ।
काय वर्णू त्याची बात ।
त्यासी नाही आदी अंत ॥ ४ ॥

– सौ. नीला प्रभू
१२, संपदा, गारोडियानगर,
घाटकोपर, मुं. ७७

# तू साईनाथ माझा

(चाल-ये दो दीवाने दिलके फिल्मःगोवा)

तू साईनाथ माझा । शिरडी ग्राम तुझा ।
      चलारे चलारे घेऊया दर्शन ऽऽ
धन्य क्षेत्र शिरडी, झालीसे पावन ।
साईबाबा तुमचे, लागूनी चरण ।।
चला हो तुम्ही आता । चरणी ठेवा माथा ।। १ ।।
      समाधी मंदीरी, जाऊ या सकल ।
      पाहु या साईचे, चरण कमल ।।
      सर्व दुःख हरते । पाहुनिया घरते ।। २ ।।
रात्रंदीन चाले, धुनी अव्याहात ।
बाबांनी लाविली, द्वारकाईत ।
पालखीची तेथे वारी । निघे ही गुरुवारी ।। ३ ।।
      पुढे दिसते हो, ती श्री चावडी ।
      बाबांना बसण्या, जागा ही आवडी ।।
      चला हो तुम्ही भक्त, होऊया सारे तृप्त ।। ४ ।।
गुरूस्थान साई, जाऊया पहाण्या ।
स्फूर्तीस्थान आम्हा, आता ते जगण्या ।।
लिंब वृक्ष डहाळी । गोड झाली सगळी ।। ५ ।।
      लेंडीबागी किमया, दाविली साईने ।
      जाळिल्या पणत्या, विहीरी जलाने ।।
      लाविले दोन वृक्ष । पाळिला अेक अश्व ।। ६ ।।
झाली वारी आता, झाले शांत मन ।
लागू दे ध्यास, तुझा रात्रंदीन ।।
'अरविंद' ठेवी माथा । चरणी साईनाथा ।। ७ ।।

—श्री. अरविंदराव एस्. शिंदे,
जयंत निवास, जि. प. अकोला

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १५—०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६—२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६—५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७—२५ |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४—२५ |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०—०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५—५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०—२० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०—३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०—२५ |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०—२५ |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०—२० |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २—०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ४—७५ |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २—०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २—५० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५—०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २—०० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०—७५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १—०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १—२५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १—५० |
| (२३) | साई किर्तनमाला, (मराठी) | २—२५ |
| (२४) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३—२५ |
| (२५) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०—०५ |
| (२६) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०—०५ |
| (२७) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०—१० |
| (२८) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६—०० |
| | प्रत्येक प्रत | ०—६० |

Regd. NO. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

**वेळ :** रोज सकाळी ११ ते १ सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

**आकार : दर दिवसास २५ पैसे**

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल

**स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय**

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( शामदासानी फौंडेशन )

**नवजीवन हौसिंग सोसायटी,**

ब्लॉक नं. ३, रुम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : **पांडुरंग मोरे,** बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१. संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.